# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १९/०६/२०१० (का.प.क्र.०३) रोजी संपन्न झालेल्या सर्व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिं.१९/०६/२०१० रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.४.१२ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच सबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.प्रशांत देसरडा
२. स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
३. स.स.श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
६. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
७. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
८. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
९. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
१०. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१६. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१७. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२१. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२२. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२३. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन

२४. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२५. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२७. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२८. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
२९. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
३०. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
३१. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३२. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३३. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३४. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३५. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३६. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३७. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३८. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३९. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
४०. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४१. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
४२. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
४३. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
४४. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
४५. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४६. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४७. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४८. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४९. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
५०. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
५१. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५२. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
५३. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५४. स.स.श्री.खान आगा मिया
५५. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
५६. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान

५७. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५८. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५९. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
६०. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
६१. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
६२. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
६३. स.स.श्रीमती काथार रेखा कैलास
६४. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
६५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६६. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६७. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६८. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६९. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
७०. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
७१. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
७२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७३. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७४. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७५. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७६. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७७. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
७८. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७९. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
८०. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
८१. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
८२. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८३. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
८४. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
८५. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
८६. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम
८७. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>चर्चा :</u>**

श्री.गिरजाराम हाळनोर :नगरनाका येथे रस्ता रूंदीकरणेच्या संदर्भात मोठे जनअंदोलन झालेले असतांना केंद्र शासनाच्या नाकर्तेपणामूळे पुन्हा त्या रस्त्यावर

एका व्यक्तीचा बळी गेला त्यांना सभागृहाच्या वतीने श्रंध्दाजली अर्पण करावी. केंद्र शासनाचा निषेध नोंदवावा.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रंध्दाजंली साठी उभे रहावे.

याचवेळी नगरनाका जवळ रस्त्यावर नुकताच एका व्यक्तीचे निधन झाले त्यास सभागृहात दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

मा.महापौर : पत्रकार कक्षात फोटोग्राफर,पत्रकार, व्हिडीओग्राफर शिवाय अन्य कुणी थांबवू नये.

श्री.मीर हिदायत अली : एक तासापूर्वी जी घटना घडली त्यात राष्ट्रगिताचा अवमान केलेला आहे ज्यांनी कुणी राष्ट्रगिताचा अवमान केला त्यांना त्याची शिक्षा झाली पाहिजे.

श्री. प्रमोद राठोड : या संदर्भात आम्ही निवेदन दिले मा. आयुक्त यांनाही निवेदन दिलेले आहे या संदर्भात काय कार्यवाही केली सभागृहात खुलासा करावा.

मा.महापौर : प्रशासनाने या बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.प्रमोद राठोड : प्रशासनाने काय कार्यवाही केली. नगरसेवक हे लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येतात जर ते राष्ट्रगिताचा अपमान करीत असतील तर देशाचा अपमान आहे सभागृहात खुर्च्या फेकतात या बाबत मा. आयुक्त यांना पत्र दिलेले आहे कार्य कार्यवाही केली खुलासा देण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :ज्यांनी पत्र दिले ते सभागृहात होते का ?

श्री.प्रमोद राठोड :मी सभागृहात जरी नसलो तरी संपूर्ण देश घडलेली घटना बघतो आहे.काय घटना घडली हे सर्वांना माहित आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :भारतीय नागरीक हा राष्ट्रगिताला थांबल्याशिवाय राहत नाही हे बिनबुडाचे आरोप करीत आहे.

श्री.प्रमोद राठोड :संपूर्ण शहर ही घटना बघते आहे जर अवमान झाला नाही असे म्हणत असेल तर योग्य नाही प्रशासनाने खुलासा करावा.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :त्या सभागृहात मा.आयुक्त होते मीही होतो. राष्ट्रगित चालू असतांना सभागृहात तोडफोड करण्यात आली यांचे साक्षीदार मा.आयुक्त आहे ते सभागृहात होते.आयुक्तांनी खुलासा करावा राष्ट्रगित चालू असतांनाच गोधंळ चालू होता अशा सदस्यांचे सभासदत्व रद्य करावे त्यांचे विरूध्द गुन्हे दाखल करावे.

श्री.मधुकर सावंत :स्थायी समिती सभागृहाचा मी सदस्य आहे घटना घडली त्यावेळी मी सभागृहात होतो. राष्ट्रगित चालू असतांना स.सदस्यांनी धिगांणा घातलेला आहे त्या संदर्भात प्रशासनाने काय कार्यवाही केली.

श्री.विकास जैन :सभागृहात जसे स.श्री. मधुकर सावंत त्या प्रमाणे आम्हीही त्या सभागृहात होतो. जेंव्हा राष्ट्रगित आम्हाला सर्वांना ऐकवण्यात आले त्याच ठिकाणी आम्ही एकाच ठिकाणी थांबवून राष्ट्रगिताचा मान सन्मान केलेला आहे अशी कोणत्याही प्रकारची अशी घटना तेथे घडलली नाही त्यामूळै मला वाटते आपण आता पुढच्या विषयावर सभेचे कामकाज सुरू करावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : काय झाले सर्व देशाने बघीतले राष्ट्रगित चालू असतांना हा गोंधळ झाला की नाही आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.मधुकर सावंत :मा.महापौर,मा.आयुक्त,नगरसचिव येथे हजर आहे सकाळच्या सभेची चित्रफित स्क्रीनवर दाखविण्यात यावी कुणी धिगांना केला सर्व समजेल.

श्री.प्रमोद राठोड :काय झाले सर्वांना माहिती आहे प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

याच वेळी सभागृहात अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलतात.

श्री.गजानन बारवाल :या बाबतीत चौकशी करावी कार्यवाही करावी कोणीही राष्ट्रगिताचा अवमान करू शकत नाही चौकशी करावी.

श्री.मिलींद दाभाडे :मा.आयुक्तांनी या बाबतीत खुलासा करावा.

मा.महापौर :पुर्ण चौकशी करून या बाबतीत खुलासा मागवू

श्री.मधुकर सावंत :त्यावेळी सभागृहात मा.आयुक्त, नगरसचिव हजर होते. काय झाले त्यासाठी चित्रफित कॅसेट आणावी स्क्रीनवर दाखवावे.

श्री.प्रमोद राठोड : राष्ट्रगित चालू असतांना हा प्रकार घडला घटनेची चित्रफित आणावी ती दाखवावी

मा.महापौर :या गोष्टीची मी स्वतः चौकशी करून निर्णय घेण्यात येईल.

श्री.प्रमोद राठोड :चौकशी करू म्हणजे डायरेक्ट आपल्याला चौकशी करण्याचे अधिकार नाही.

श्री.गजानन बारवाल :चौकशी समिती नेमून निर्णय घ्यावा.

श्री.प्रमोद राठोड :आपण स्वत सीडी लावून तेथे काय घडलेले आहे ते बघावे.

मा.महापौर :चौकशी समिती नेमून त्या बाबतीत निर्णय घेवू.

श्री.मधुकर सावंत :आज घटनेमूळे अपमान झालेला आहे.आपण एका पक्षाचे महापौर नाही संपूर्ण पक्षाचे शहराचे महापौर आहात. आज झालेली घटना अत्यंत दुर्देवी घटना आहे या घटनेचा निषेध करतो.

याच वेळी अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलतात

श्री.गिरजाराम हाळनोर : कुठलाही अधिकार नसतांना नगरसेवक व इतरावर पोलीसांनी जी मारहाण केली त्याचा मी निषेध करतो.त्याही घटनेची पूर्णपणे दखल घ्यावी.

याच वेळी अनेक स.सदस्य मा. महापौर डायस जवळ जावून निषेधाच्या घोषणा देतात व सभागृहा बाहेर जातात.

मा.महापौर : १० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.(वेळ ४-२० पुन्हा सभेला ४-३० वाजता सुरूवात.)

श्री. गिरजाराम हाळनोर : आज स्थायी समितीच्या सभेमध्ये जो काही प्रकार घडला त्या बाबतीत स्थायी समितीचे सदस्य श्री. रेणुकादास वैद्य,श्री. जगदीश सिध्द, श्री.विकास जैन,श्री.विजय वाघचौरे,श्री.सुर्यकांत जायभाये, श्री.महेश माळवतकर,श्री.आगा खॉन मिया, सौ.साधना सुरडकर यांनी आपल्याकडे पत्र दिलेले आहे या सदस्यांना विश्वासान न घेता कुठल्याही प्रकारची चर्चा न करता जो महापालिकेचा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत आहे जेथून महापालिकेला मोठे उत्पन्न मिळते. असा मोठा ठराव स.नगरसेवकांचा विरोध असतांना त्यांचेशी चर्चा न करता मंजूर केलेला आहे त्यामूळे महापालिकेचे आर्थीक नुकसान होण्याची शक्यता आहे कदापी चर्चेतून जे १३८ कोटीचे टारगेट दिलेले आहे ते १५०, १४० कोटीपर्यत वाढवू शकत होते यातून महापालिकेचे नुकसान झालेले आहे असे आमचे मत आहे. विनंती की,हा जो ठराव झाला तो या नगरसेवकांचा विरोध लक्षात न घेता मंजूर केलेला आहे कृपया या ठरावास स्थगिती दयावी.

श्री.गजानन बारवाल :आताच मा. सभागृह नेता यांनी महत्वाच्या प्रश्नावर वाचा फोडली आहे. आज झालेल्या स्थायी समिती सभेत कोणत्याही प्रकारची साधक-बाधक चर्चा न होता हा विषय अचानकपणे ८ सदस्यांचा विरोध असतांना मंजूर करण्याचा प्रयत्न मा.सभापतीनी केला तो अतिशय निषेधार्थ आहे असे वाटते. ८ स्थायी समितीच्या सदस्यांनी पत्र दिलेले आहे. ते आपल्याकडे आले असेल विनंती की आजच्या आज सदर टेंडर थांबविण्यात यावे.त्याची मंजूरी थांबविण्यात यावी त्या सभेचे इतिवृत्त कन्फॉरमेशन होवू नये इतिवृत्ताची प्रत कुणाला देण्यात येवू नये.

श्री. विकास जैन :जी सभागृहात सदस्य संख्या होती त्यातील ८ सदस्यांचा विरोध होता व विरोधक ७ सदस्य होते त्या हिशोबाने आपण या बाबतीत निर्णय घ्यावा.८ सदस्यांनी विरोध दाखविलेला आहे या प्रश्नासाठी विनंती की या विषयाला आपण स्थगिती दयावी व त्या सभेचे इतिवृत्त वितरीत होवू नये या प्रकारचे रूलीग देवून नगरसचिव यांना तसे सुचीत करण्यात यावे.

मा. महापौर :आज स्थायी समितीच्या ८ सदस्यांनी जकात ठेका एजन्सीला देणे बाबतचा प्रस्तावाला बहुमताने लेखी विरोध केला त्यामूळे आजच्या स्थायी समिती प्रस्तावाला स्थगिती देण्यात येते.प्रशासनाने स्थगितीची दखल घेवून कार्यवाही करावी.साधक-बाधक चर्चा झाली असती तर महापालिकेचे उदिदष्ट वाढले असते महापालिकेचा फायदा झाला असता, मिनीटस थांबवावे.

श्री.गजानन बारवाल : पावसाळा सुरू झाला नाले साफ झालेले नाही आपण पाहणी केली प्रशासनाने ही करावयास पाहिजे नाले साफसफाई करणे हा महत्वाचा प्रश्न आहे सर्व ठिकाणचे नाले साफसफाई व्यवस्थीत केलेली दिसून येत नाही. क्रांतीनगर ते पदमपूरा ,तसेच बन्सीलाल नगर मधील वेदांन्त हॉटेल ते जहागीर कॉलनीपर्यन्तचा नाला साफ न झाल्यामूळे नागरीकांना त्रास होतो साफसफाई व्यवस्थीत होवून संपूर्ण कचरा काढल्या गेला पाहिजे.

सौ.रेखा काथार :माझे वार्डातील बौध्दनगर, उत्तमनगर भागातील नाल्याची साफसफाई व्हावी. सभागृह नेता यांनी तेथे व्हिजीट दिलेली आहे.या नाल्याची सफाई करावी म्हणून आदेश दिलेले होते कार्यवाही केली नाही सध्या डासांचे प्रमाणही वाढलेले आहे तसेच घराचे बांधकामाचे मटेरियल नाल्याच्या कडेला पडलेले आहे तेथून शाळेचा रस्ता आहे अशा परीस्थितीत अपघात होण्याची शक्यता आहे या संदर्भातही योग्य ती कार्यवाही करावी.

श्री. त्र्यंबक तुपे :पावसाळा सुरू झाला अनेक प्रश्न समोर आहेत.नाले सफाई बरोबरच रस्ते दुरूस्ती व इतर विकासाचे प्रश्न सोडविणे आवश्चयक आहे नाल्यात गाळ, कचरा मोठया प्रमाणात साचलेला दिसून येतो मा.महापौर,मा.आयुक्त यांनी जेथे व्हिजीट केली तेथील कामे सुरू केली.इतर ठिकाणची झालेली दिसून येत नाही.बालाजीनगर, शिवशंकर कॉलनीतून मोठा नाला वाहतो तेथील आपण पाहणी करून कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.नाले सफाई ही वार्ड कार्यालयाच्या माध्यमातून होत आहे १० हजाराची तरतूद असल्याचे सांगण्यात येते परंतु माझे माहिती प्रमाणे एका वार्डसाठी १ लक्षची तरतूद आहे असे असेल तर तेथील नाले आतापर्यत साफसफाई का होत नाही.काही प्रमाणात

नाल्याच्या बाजूला अतिक्रमण असेल मटेरियल टाकले असेल परंतु जोपर्यत नाल्यातील प्रवाह सुरळीत करीत नाही तोपर्यत अडचणी दुर होणार नाही.गुलमंडी, औषधीभवन येथील नाल्यावर मोठमोठया इमारती आहेत त्याखालील नाला साफ करण्याची जबाबदारी इमारत मालक किंवा दुकानदार यांचेकडे आहे परंतु सफाई होत नाही. तेथे पाण्याचा प्रवाह व्यवस्थीत होत नसल्यामूळे अति पावसामूळे बाजूच्या घरामध्ये पाणी जाते साचते अशा ठिकाणच्या नाल्याची आपण पाहणी करून कार्यवाही करावी तसेच रस्त्याची मोठी दुरावस्था झाली अनेक रस्त्यावर खड्डे पडले तेथे पॅचवर्क करावे म्हणून मागणी केली त्यासाठी किती निधी उपलब्ध आहे कोणत्या रस्त्याचे पॅचवर्क होणार सविस्तर माहिती दयावी.

श्री.अनिल जैस्वाल :वार्ड क्र.१९ मधील नाला साफ झालेला नाही त्या ठिकाणी आपण पाहणी करावी. मा.महापौर,आयुक्त यांनी पाहणी करावी वार्ड क्र. २० व २१ येथील नाल्याचे पाणी वार्ड क्र. १९ च्या भागातून वाहते.सोनामाता शाळेजवळ नाल्यात ड्रेनेज लाईन चोकअप होते ती फुटलेली आहे घाण पाणी वाहते.बैठक संपल्यानंतर आपण पाहणी करावी.

श्री.सुरेद्र कुलकर्णी :वार्ड क्र. ६९ जवाहर कॉलनी भागात आपण नाल्याची पाहणी केली होती तो नाला साफ करावा म्हणून आदेशीत केले अदयाप केले नाही तसेच त्या भागात रस्त्याची अवस्था वाईट झाली आहे. नाल्याची जी साफसफाई झाली नाल्याच्या कडेला कचरा टाकला तो पुन्हा पाण्यात वाहून जातो. तसेच स्वच्छतेकडे लक्ष दयावे पाण्याची ओरड नाही पण पाण्याच्या वेळा योग्य नाही.

श्री.कृष्णा बनकर :माझे वार्डात कडील भागात देखिल मोठा नाला आहे व्यवस्थीत साफ होत नाही नाल्यात गाळ व ड्रेनेज लाईन फुटलेली आहे ३-४ महिण्यापासून या संदर्भात मा.आयुक्तांकडे कार्यवाही करण्याची मागणी केली. काम अदयाप झालेले नाही.एक चेंबरचे काम केले इतर काम झाले नाही. रॅमकीच्या कर्मचा-यांना मराठी हिंदी बोललेले कळत नाही. त्यांचेकडून स्वच्छता व्यवस्थित होत नाही त्यांचेशी झालेला कशा प्रकारे करार झालेला आहे खुलासा देण्यात यावा.यापूर्वी शहरातील काही एजन्सीला साफसफाईचे काम दिले होते चांगली स्वच्छता होत होती. अशा एजन्सीकडूनच स्वच्छतेचे काम करून घ्यावे. रॅमकीचा करार रद्य करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरातील विविध नाले साफ करण्याची गरज आहे अधिकायांना सोबत घेवून दाखवत होतो परंतु दुर्देवाने बदल्याचे सत्र चालू झाले संपर्क केला तर माझी बदली झाली अशी उत्तरे मिळतात. नाले सफाई करणेच्या कामावर नियत्रंण ठेवण्यासाठी एक स्वतंत्र अधिकारी नेमावे.जेणे करून आमच्या अडचणी त्यांचे माध्यमातून सोडवता येतील. लहान नाल्यातून सुध्द मोठे प्रमाणात पाणी वाहते हे काम वार्ड कार्यालय अंतर्गत येते.फावडा पार्टी जे कर्मचारी आहे ते कुठे काम करतात माहित नाही.मध्यवस्तीत माझा वार्ड आहे. रस्त्याची पाहणी करणेसाठी मा.आयुक्तांना विनंती केली होती कामाची वर्क ऑर्डर निवडणुकीच्या अगोदर झाली परंतु अदयाप काम सुरू झाले नाही शहरातील इतर भागात जसे खडडे आहे त्याच प्रमाणे या वार्डात आहे. मा.महापौर,

मा.आयुक्त यांनी माझे वार्डात रस्त्याची पाहणी करावी व काम करणेच्या सुचना दयाव्यात.

श्री.हुशारसिंग चव्हाण :वार्ड ४७ मध्ये पावसाळी गटारीचे एका कामाचे अंदाजपत्रक ३ वर्षा पूर्वी १० लक्ष होते ते १८ लक्ष झाले. चिश्तीया कॉलनी मधून येणारे पावसाचे पाणी एन-६ मधील लोकांच्या घरात जाते कार्य. अभियंता श्री.पानझडे यांनी तेथे पाहणी केली त्वरीत काम करण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर :नाले सफाई का होत नाही संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :नाले सफाईसाठी प्रत्येक वार्ड कार्यालय अंतर्गत किती तरतूद दिलेली आहे.किती रक्कमेचे टेंडर काढले कुठे काम चालू आहे माहिती दयावी.

श्री.त्र्यंबक तुपे :प्रत्येक प्रभाग कार्यालयासाठी किती तरतूद दिलेली आहे.कोणत्या भागातील कामे झाली व आता चालू आहे शहर अभियंता यांनी माहिती दयावी.

श्री.प्रशांत देसरडा :आज ज्या नगरसेवकांनी महापालिकेच्या आवारात मारहाण केली त्यांचे नगरसेवक पद रद्य करावे. या महापालिकेची प्रतिमा संपूर्ण शहर व महाराष्ट्रात या घटनेमूळे खराब झालेली आहे.

यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.प्रशांत देसरडा :ज्या नगरसेवकांनी महानगरपालिकेत येवून माहरहाण केली त्यांचे नगरसेवक पद रद्य करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :शहरात साफसफाई व नाले सफाई होत नाही.महत्वाचा विषय आहे त्यावर खुलासा घ्यावा.

श्री.प्रशांत देसरडा :इतिवृत्तात लिहून घ्यावे ज्या नगरसेवकाने महानगरपालिकेत येउन मारहाण केली त्याचे नगरसेवक पद रद्य करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :हे कधीही येतील अगोदर आमचा खुलासा घ्यावा. लोकांच्या घरात पाणी शिरले.

श्री.प्रशांत देसरडा : ज्या नगरसेवकांनी महानगरपालिकेच्या आवारात मारहाण केली त्यांचेवर कार्यवाही करावी.महाराष्ट्रात नाव खराब झाले त्या नगरसेवकांवर कार्यवाही करणार का?

श्री.गिरजाराम हाळनोर :नगरसेवकांना मारहाण झाली ते उपचार घेत आहे. जे त्यांचे बाबतीत येथे येवून बोलून गोधळ घालत आहे त्यांचे सभासदत्व रद्य करावे

याच वेळी अनेक स.सदस्य मा.महापौर डायस जवळ जाउन नगरसेवकांवर कार्यवाही करण्याची मागणी करतात मोठमोठयाने बोलणे चालू असते.

श्री.गजानन बारवाल :खुन्नसबाजी करण्याच्या दृष्टीने सभागृहात गोंधळ चालू आहे अशा सदस्यांवर कार्यवाही करावी त्यांचे सभासदत्व रद्य करावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :नाले सफाई संदर्भात खुलासा मागविलेला आहे माहिती घ्यावी.

मा.महापौर :सबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.प्रशांत देसरडा :संबधीत अधिकारी जे बोलतात ते इतिवृत्तात संपूर्ण यावे.खुलासा नोंद करून घ्यावा दबावाला बळी पडू नये.

श्री.गिरजाराम हाळनोंर :मा.महापौर यांचे परवानगी शिवाय कुठलाही विषय इतिवृत्तात घेवू नये.

श्री.प्रशांत देसरडा :ज्या नगरसेवकांनी महापालिकेच्या आवारात मारहाण केली त्यांचे सभासदत्व रद्य झालेच पाहिजे त्यांचेमूळे महानगरपालिकेची प्रतिमा खराब झाली त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.गिरजाराम हाळनोर :नाले सफाईचा विषय महत्वाचा आहे लोकांच्या घरात पाणी गेले तर आपल्यालाच विचारणा होईल. खुलासा घेण्यात यावा.

याच वेळी स.सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :सुरक्षा रक्षक यांनी जे स.सदस्य पदाधिकारी मोठयाने बोलतात त्यांना बाहेर घेवून जावे.(वेळ ४-४५ वा.)

श्री.गिरजाराम हाळनोंर :ज्या नगरसेवका विषयी बोलतात तेच औषधोपचार घेत आहे.

याच वेळी सभागृहात स.सदस्य मोठमोठयाने बोलतात.

मा.महापौर :सुरक्षा रक्षकांनी आदेश पाळावे संबधीत सदस्यांना बाहेर घेवून जावे.

श्री.प्रशांत देसरडा :ज्या सदस्यांनी महापालिकेच्या आवारात मारहाण केली त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही होणार की नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :नाले सफाई संदर्भात माहिती घ्यावी.

याच वेळी सभागृहात मोठमोठयाने स.सदस्य बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :ज्या नगरसेवकांवर पोलीसानी हल्ला केला ही अत्यंत निदंणीय बाब आहे त्याचा मी निषेध करते.

श्री.गिरजाराम हाळनोर :जे सदस्य आपल्या आदेशाचे पालन करीत नाही त्यांचे सभासदत्व आजच्या पुरते रद्य करावे.

श्री.गजानन बारवाल :जे स.सदस्य आदेशाचे पालन करीत नसतील गोधंळ घालत असतील व चर्चा होवू देत नसेतील त्याची चौकशी होवून कार्यवाही झाली पाहिजे.

याच वेळी काही स.सदस्य मा.महापौर डायस समोर खाली बसतात. मोठमोठयाने बोलतात

श्री.त्र्यंबक तुपे :नाले सफाईच्या संदर्भात खुलासा देण्यात यावा.

शहर अभियंता :औरंगाबाद शहरात मोठे नाले यांची लांबी ६४.कि.मीटर आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :आपल्या आदेशाचे जे सदस्य पालन करीत नाही त्यांचे आजच्या पूरते सभासदत्व रद्य करावे.

मा.महापौर :ज्या सदस्यांनी सभागृहात गोधळ घातला त्यांचे सभासदत्व आजच्या दिवसापूरते रद्य करण्यात येते.

श्री.गजानन बारवाल :गोंधळ करणा-या सदस्यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्य केले त्यांना सभागृहा बाहेर पाठवावे पुन्हा सभागृहात प्रवेश देवू नये.

मा.महापौर :गोंधळ घालणा-या सदस्यांचे व पदाधिका-यांचे सभासदत्व आजच्या दिवसा पुरते रद्य करीत आहे पुन्हा त्यांना सभागृहात प्रवेश देवू नये.शहर अभियंता यांनी नाले सफाई संदर्भात खुलासा करावा.

याच वेळी भारतीय जनता पक्षाचे स.सदस्य सभागृहाच्या बाहेर जातात.

शहर अभियंता :शहरात एकूण मोठे नाले ६४ कि.मीटर आहे ६४ कि.मी. लांबीमध्ये महानपालिकेने ५-५ लक्षच्या निविदा काढून प्रत्येक वार्डात गुंत्तेदारास काम दिलेले आहे पाण्याचा प्रवाह सुरळीत करणे हे काम पुर्ण ४ महिणे पावसाळयात चालू असणार आहे.

श्री.गजानन बारवाल :पुर्णपणे नाले सफाई केले नाही अनेक ठिकाणी पाणी थांबलेले दिसून येते. संपूर्ण नाले साफ करणार अशी घोषणा केली पाउस केंव्हाही येवू शकतो प्रत्येक वेळेस घाण काढणार काय?

शहर अभियंता : ४ महिणे पुर्व पावसाळयात ही प्रोसेस चालू ठेवणार आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :पावसाळा सुरू होण्या अगोदर ही कार्यवाही का केली जात नाही. नाले सफाई केले असे म्हटले जाते कोणते नाले साफ केले दाखवावे.

श्री.गजानन बारवाल :सुयोग कॉलनी, पदमपूरा भागात नाल्याचे पाणी आज रस्त्यावर वाहते. जालाननगर नाल्याची हीच परीस्थिती आहे कुठेही नाले साफ होत नाही. अधिकारी बदलून येतात कोणीही सहकार्य करीत नाही. जशी साफसफाई होते तशी नाल्याचीही साफसफाई व्हावी.

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :शहरात एकूण नाले किती कोणत्या नाल्याचे काम दिले काम किती ठिकाणी चालू आहे. |
| शहर अभियंता | :वार्ड अ ते फ मध्ये एकूण ६ नाले मोठे असून त्यांची लांबी ६४ कि.मी. आहे. |
| श्री.रेणूकादास वैद्य | :माझे वार्डातच एकूण ६ नाले आहे. |
| शहर अभियंता | :या भागात बिलजलीनगरचा नाला फक्त मोठा आहे.तो उस्मानपुरा पोलीसस्टेशनपर्यत आहे तो यात नमूद केलेला आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :बिजलीनगर रविद्रनगर नाला यात घेतलेला नाही. |
| शहर अभियंता | :वार्ड फ अंतर्गत घेतलेला आहे भानुदासनगर पासून सेंन्टफ्रांन्सीच्या शाळेच्या पाठीमागून तो सुरू होतो |
| श्री.त्र्यंबक तुपे | : नाले सफाई करणे म्हणजे नेमके काय ? |
| शहर अभियंता | :नाल सफाई करणे म्हणजे आजच्या घडीला नाल्यातील पाण्याचा प्रवाह सुरळीत करणे संपूर्ण गाळ काढणेचे यात समावेश केलेला नाही. त्यासाठी मोठी तरतूद लागणार आहे यावेळेस महापालिकेला एवढा खर्च करणे शक्य नाही. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :कचरा लिप्ट केला जात नाही नाल्याच्या बाजूलाच टाकला जातो तोच पुन्हा पाण्यात वाहून जातो. |
| शहर अभियंता | :नाल्याच्या काठावरील कचरा लिप्ट केलेला आहे काही ठिकाणी राहिला असेल निदर्शनास आणून दयावे. कुठे लिप्ट केला तो दाखवून देवू शकतो. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :वरच्या वर सफाई होते पैसा वाया जातो त्यासाठी महापालिकेकडे जेसीबी व इतर वाहन वापरून महापालिकेच्या अधिका-यांनी लक्ष देवून काम केले तर ख-या अर्थाने गाळ काढल्याचे दिसून येईल. |
| शहर अभियंता | :पावसाळा सुरू होणेपूर्वी महापालिकेचे जेसीबी व टिप्परने नाले सफाईचे काम केले मा.महापौर यांनी पाहणीही केली होती.जेथे साफसफाई करणे बाकी असेल निदर्शनास आणून दयावे कार्यवाही केली जाईल. |
| श्री.गजानन बारवाल | :आताच ज्या ज्या सुचना स.सदस्यांनी केल्या त्या बाबतीत नाले सफाईचे कामे त्वरीत सुरू करण्याचे आदेशीत करावे. |
| श्री.गिरजाराम हाळनोर | :वरच्या वर कचरा न काढता १२ ही महिणे नाले एक एक नाल्याची पुर्णपणे साफसफाई व्हावी महापालिकेकडे टिप्पर,जेसीबी व लेबर तसेच चांगले काम करणारे अधिकारी आहे तसे प्रशासनास आदेशीत करावे. |
| श्री.सुशील खेडकर | :वार्ड फ चे अभियंता यांना वेळोवेळी सभापती म्हणून मी अनेक वेळा एका संचिकेच्या संदर्भात विचारणा केली परंतु सदर संचिका मा.आयुक्त अधिका-याकडे आहे अशी उत्तरे दिली गेली.वार्ड कार्यालय फ मध्ये जास्त वसुली होते त्याप्रमाणे तेथे नागरीकांना सुविधाही दिल्या पाहिजे. पावसाळयापूर्वी मा.आयुक्त यांना एका कामाच्या टेंडर संदर्भात चर्चा केली ६ वार्डाचे पावसाचे पाणी मिळून ते वार्डाच्या बॉन्ड्रीवर थांबते नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते लहान लहान सुविधा जर नागरीकांना देवू शकत नसेल तर टॅक्स का भरायचा अशी मानसिकता नागरीकांची होईल त्यासाठी ज्या संचिका विकास कामाच्या संदर्भात प्रलंबीत आहे त्या निकाली काढाव्यात. |
| मा.महापौर | :शहर अभियंता यांनी वार्डात पुन्हा भेट देऊन कामाची गरज असल्यास समाधानकारक काम करण्यात यावे. |

| | |
|---|---|
| श्री.विजय वाघचौरे | :पावसाळा सुरू झालेला आहे औषध फवारणी किती ठिकाणी करण्यात आलेली आहे. प्रशासनाने खुलासा करावा. |
| श्री.अनिल जैस्वाल | :स.सदस्यानी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार फवारणी केव्हा सुरू करणार आहे खुलासा करण्यात यावा. |
| आरोग्य वै.अधिकारी | :आपले फवारणीचे काम वर्षभर चालू असते. स्प्रेचे कामे नेहमीच चालू असते. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :वार्डात फवारणी केली जात नाही, खुलासा चुकीचा आहे. कोणीही सांगेल का फवारणी झाली म्हणून फवारणी झालीतर सही नेली का. |
| श्री.विजय वाघचौरे | :औषध नाही संपलेले आहे म्हणून सांगण्यात येते. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :या दिवसात मोहीम चालु आहे का? |
| मा.महापौर | :प्रशासनाने खुलासा करावा. |
| आरोग्य वैद्यकीय अधिकारी | : फवारणीचे काम वर्षभर चालू असते. नाल्यांसाठी तीन ट्रॅक्टरर्स लावण्यात आलेले आहे. ट्रॅक्टरर्सच्या साहयाने सर्व नाल्यावरती फवारणी केली जात आहे. त्याच वेळी मजुरांच्या माध्यमातुन घरोघरी जाऊन फवारणी,फॉगींग,ॲबेट फवारणीचे काम चालू आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :फवारणी झाली आहे म्हणुन नागरीकांच्या स्वाक्षऱ्या घेतलेल्या आहेत काय? |
| श्री.त्र्यंबक तुपे | :कुठे चालू आहे माहिती आहे का? |
| आरोग्य वै.अधिकारी | :पुढच्या वेळेस माहिती देण्यात येईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :संबधीत अधिकाऱ्यांने जी माहिती दिलेली आहे ती चुकीची माहिती आहे संबधीत वार्डातील नागरीकांना विचारणा केली असता फवारणीसाठी ट्रॅक्टर आले होते का? घरोघरी फवारणी केली काय? नागरीकांचे उत्तर नाही म्हणून असते. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :पाऊस पडल्यानंतर डासांचा प्रार्दुभाव वाढतो, अनेक आजार उत्पन्न होतात या दिवसांत प्रशासनाकडून विशेष मोहिम राबविली जाते काय? खुलासा करण्यात यावा. |
| आरोग्य वै.अधिकारी | :दरवर्षी पावसाळयात डेंग्यु या आजाराला सामोरे जावे लागते, मजूरांमार्फत ॲबेट ट्रिटमेंट आणि गप्पी माशांचा कार्यक्रम जास्त प्रमाणात राबविला जातो. |
| श्री.त्रिबंक तुपे | :एखाद्या वार्डात काम चालू आहे त्याबाबतची माहिती देण्यात यावी. |
| आरोग्य वै.अधिकारी | :यासंबधीची माहिती पुढच्या वेळेस सादर करण्यात येईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :औषध फवारणी वेळेवर होत नाही. औषध फवारणी केल्यानंतर तेथील प्रतिष्ठीत नागरीकांच्या सहया घेण्यात याव्यात त्यांची प्रत्यक्ष बघीतले आहे अशा प्रकारचा अहवाल देण्यात यावा. |
| मा.महापौर | :प्रशासनाने स.सदस्यांच्या समस्या विचारात घेऊन ताबडतोब धूर फवारणी व स्वच्छतेबाबत दखल घ्यावी. |
| श्री.त्रिबंक तुपे | :गुंठेवारी बाबत प्रशासनाने आणि मा.महापौर यांनी कॅम्प लावले त्याबाबत अभिनंदन करण्यात येते. गुंठेवारीच्या माध्यमातुन हया शहराचा विकास होईल काय? मोहिम एक ते दोन दिवस राबविली जाते पुन्हा त्याकडे दुर्लक्ष होते. गुंठेवारी भागात काम करणे अवघड आहे. शहरात बऱ्याच भागात ७० टक्के गुंठेवारीचा भाग आहे. महानगरपालिकेच्या वतीने जे कॅम्प लावले जातात ते एका वार्डात किमान आठ दिवसांसाठी लावण्यात यावे. गुंठेवारी भागात काम करतांना छोटया छोटया कामांसाठीही निधी |

नसतो मनपाची आर्थिक स्थिती बिकट आहे. शहरात चारही बाजूंनी अनाधिकृत बांधकाम प्लॉटिंग सर्रासपणे चालू आहे. त्यामुळे त्यांना सुविधा देता येत नाही व अनेक अडचणी निर्माण होतात. महानगरपालिकेत १० ते.१२ इमारत निरीक्षक आहेत त्यांच्या माध्यमातून पुर्ण शहराचे काम करीत आहोत. इमारत निरीक्षक यांची संख्या वाढविली पाहिजेत. अनाधिकृत प्लॉटिंग जोपर्यंत थाबणार नाही तोपर्यंत शहराचा विकास होणार नाही. शहरात गुंठेवारीवर विशेष लक्ष दिल्याबाबत अभिनंदन करण्यात येते.

श्री.सुशील खेडकर :पॅचवर्कच्या फाईलीबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे खुलासा करण्यात यावा. १५ दिवसांपासून फाईल पाठविण्यात आली आहे मंजूर होणार किंवा नाही खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :वार्ड अ ते फ च्या दोन-दोन निवीदा कालच फ्लोट केल्या आहेत. मंगळवारी ओपन केल्या जातील आणि लगेचच कामास सरूवात होईल.

श्री.सुशिल खेडकर :शहरात जे बांधकाम चालू आहे त्या ठिकाणी स्वतःचे ट्रॅंकर लावून पाणीपुरवठा केला पाहिजे परंतु महानगरपालिकेचेच अनाधिकृत नळ कनेक्शन घेऊन बांधकामास पाणी वापरले जाते. जे अनाधिकृत नळ कनेक्शन घेतलेले आहे त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

सौ.रेखा काथार :वार्डात गेल्या वर्षभरापासून पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी येत आहे. पिवळया रंगाचे व दुर्गंधीयुक्त पाणी आहे. संबधीत अधिकाऱ्यसांना पत्र दिलेले आहे त्याची स्थळ पहाणी केलेली आहे. अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. बौध्द नगर, शिवशंकर कॉलनी, नाथनगर आणि पंचशिल नगर या पाच वसाहतीत येते. तरी प्रशासनाने या ठिकाणी लक्ष द्यावे व समस्या तातडीने सोडविण्यात यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत तेथील नागरीकांनी मा.आयुक्तांकडे दुर्गंधीयुक्त पाणी घेऊन आले होते. गेल्या १५ दिवसांपासून काम चालू आहे अजुनही फॉल्ट सापडलेला नाही. नागरीकांना आजही ट्रॅंकरने पाणी पुरवठा केला जात आहे. तरी प्रशासनाने सदरील काम हे जलदगतीने करावे हि विनंती.

मा.महापौर :प्रशासनाने खुलासा करण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :ज्या ठिकाणी बिल्डर बांधकाम करताता बरेचसे सर्व्हिसींग सेंटर चालतात महानगरपालिकेचे कनेक्शन घेऊन बांधकाम करतात. प्रशासनाने जेथे अनाधिकृत जोडणी आहे तेथे त्वरीत लक्ष घालुन संबधीतावर गुन्हे नोंदविण्यात यावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :गुन्हे दाखल करण्यात यावे.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी याबाबत दखल घेऊन अनाधिकृत नळ कनेक्शन घेतलेले आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :बऱ्याचश्या कामाची निवडणुकीपुर्वी वर्क ऑर्डर झालेली आहे परंतू ती कामे अजुनही मार्गी लागलेली नाही संबधीत अधिकाऱ्यांना विचारणा केली असता मा.आयुक्तांचे पत्र आहे म्हणून सांगण्यात येते. किमान ज्या कामांची वर्क ऑर्डर झालेली आहे ती कामे सुरू झाली पाहिजे. याबाबत मा.आयुक्तांचे काय मत आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल :गेल्या वर्षी अनेक कामांचे उद्घाटन झालेले आहे मा.आयुक्तांच्या आदेशान्वये अनेक कामे थांबलेले आहे. पाण्याचे, लाईटचे अनेक कामे

आहे. पदमपुरा, बन्सीलालनगर टेंडर निघुन सुध्दा कामे झालेली नाही.कार्यादेश दिलेले आहे, कामे अर्धवट झाली आहे. ते त्वरीत सुरू करण्यात यावे.

श्री.गिरजाराम हाळनोर :गुरूजन हॉ.सोसायटी आणि सम्राटनगर येथे डांबरीकरणाचे काम सुरू झ ााले पहिला लेअर टाकण्यात आला नंतर काम बंद करण्यात आले संबधीत अधिकाऱ्यांना विचारणा केली असता कंत्राटदार काम करण्यात येत नाही म्हणून सांगण्यात येते. त्यांना ब्लॅक लिस्ट का करण्यात येत नाही. अर्धवट जे कामे आहेत ते पुर्ण करण्यात यावेत.

मा.आयुक्त :हा अतिशय जिव्हाळयाचा आणि महत्वाचा विषय आहे मंजूर झालेले कामे मंजूर केलेली कामे व्हायला हवीत वाटते. कंत्राटदारांची बिले दिली पाहिजेत आणि कामे झाली पाहिजेत परंतु पैशाचे सोंग आणता येत नाही. बजेट संदर्भात एक बैठक आयोजित केली होती गेल्या वर्षीचे बजेट ५५० कोटी रूपयांचे होते प्रत्यक्ष निधी आणि वसुली यातुन ३८६ कोटी मिळालेत. १६४ कोटी रूपये कमी पडलेले आहे. मनपाचे स्वत:चे उत्पन्न हे २०० कोटींचे होते. कमीटेड एक्सपिडेंचर करावाच लागणार आहे. ८५ कोटी पगाराचा खर्च ४० कोटी खर्च विजेवर, ५ कोटींचा इंटरेस्ट द्यावा लागतो ३.५० कोटींचे इंधन, ४ कोटी हा आणखी खर्च आहे,११ कोटी रूपये मजूरांच्या पगारावर खर्च होतात, जायकवाडीची पाणीपट्टी २.५ कोटींची द्यावी लागते. ३ कोटी औषधांसाठी खर्च करावे लागतात. गेल्या वर्षी मार्किंग केलेली कामे होती त्यात १०० कोटींचा स्लॅप आहे. ५ कोटी रूपये इतर स्किमचे अगोदरच खर्च केलेले आहे १७० कोटीचे आकडे हे स्पिलचे आहेत. स्पिलसाठी साधारणत: २०० कोटींची गरज पडेल. कमिटेड एक्सपेंडीचर साठी २०० कोटी आणि स्पिले १०० कोटी असे ३०० कोटी रूपयांचा खर्च अपेक्षीत आहे. मनपाचे स्वत:चे उत्पन्न २५० कोटी जाऊ शकते. कोणत्याही माध्यमातून हा कमिटेड एक्स्पेंडिचर पाहिल्यास हा ३०० कोटींचा आहे. ५० कोटी रूपये कोणत्याही माध्यमातून, करांच्या माध्यमातून किंवा इतर माध्यमातून उभा करावा लागणार आहे. अशा प्रकारची परिस्थिती असल्यामुळे उत्पन्नाचे वेगवेगळे पर्याय शोधणे कार्यवाही करणे ही प्रक्रिया सुरू आहे. त्यानुसार अधिकाऱ्यांना सूचना आहे की, अत्यावश्यक कामे आहे त्यास प्राधान्य देण्यात यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :प्रशासनाने जो स्पिलचा आकडा सांगीतलेला आहे. किती दिवस काम करता येणार नाही हे प्रशासनाने माहिती दिली पाहिजे. रस्त्याचे कामांना प्राधान्य दिले पाहिजेत. वार्ड कार्यालयाअतर्गत ड्रेनेज चोकअप झाल्यास कुठलाही कंत्राटदार रूपये ३००० चे काम करण्यास तयार नाही. याबाबतीतचे नियोजन पुर्वीपासूनच व्हयला पाहिजे होते. अशीच स्थिती राहिलीतर पाच वर्ष कामेच होणार नाही. प्रशासनास व मा.महापौर यांना विनंती करण्यात येते की, ड्रेनेज,पाणीपुरवठा या कामांना तातडीने पैसा उपलब्ध करून देण्यात यावे जेणे करून हे कामे होतील.

श्री.सुशिल खेडकर :सहा प्रभागामध्ये टॅक्सेशन आहे त्या त्या प्रभागात टेंडर कॉल करायला पाहिजे ज्या ठिकाणी कर वसुली जास्त आहे त्या ठिकाणचा जास्त विकास होणे गरजेचे आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :पैसे नसतील तर देयके थांबविले असेल.

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :मागील वर्षाचे जे महत्वाचे कामे आहेत ते केव्हा सुरू करणार याची माहिती देण्यात यावी. प्रशासनास विनंती आहे की, जे महत्वाचे कामे आहेत त्याची स्थळ पहाणी करून त्यास मान्यता द्यावी. |
| श्री.सुशिल खेडकर | :वार्डात नाशिकच्या कंपणीला लाईटचे काम बीओटीवर देण्यात आलेले आहे.वार्डातील लाईटचे मेंन्टेनन्स करण्यासाठी दुरध्वनीवरून संपर्क साधला असता मटेरिअल नसल्यामुळे काम करता येत नाही म्हणून सांगण्यात आले. सदर कंत्राटदारास बिल अदा केले जाणार आहे किंवा नाही माहिती देण्यात यावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :काही महत्वाची कामे करतांना प्राधान्याने कुठल्या वार्डात कुठली कामे करायचे जसे ड्रेनेज,पाणी पुरवठा या सारखे कामे प्रशासनाने ठरविले आहे. यास मी सहमत आहे. माझ्या वार्डात महानगरपालिकेस डिस्पुटेड जागा मिळण्यासाठी लढलो होतो त्यात यशस्वीही झालो. परंतु कोटयावधींची जागा इतरांच्या घशात जाणार ४-५ लक्ष खर्च होईल. प्रशासनाने या गोष्टींना प्राध्यान्य दिले पाहिजेत व काम केले पाहिजे. |
| श्री.कैलास गायकवाड | :शासनाने गेल्या वर्षी आठवीचा वर्ग सुरू करण्याची परवानगी दिली परवानगी दिल्यानंतर शिक्षणाधिकाऱ्यांनी ज्या विभागाची मान्यता असते त्या करीता मा.आयुक्तांकडे संचिका पाठविणे गरजेचे असते सदरची संचिकेची कार्यवाही सुरू केलेली नाही. मागील वर्षी शिक्षण समितीचा सदस्य असल्यामुळे सदर संचिकेच्या मागे होते. तत्कालिन मा.महापौरांनी शिक्षण संचालकांना फोनद्वारे माहिती कळविली परंतु संबधीत अधिकारी यांनी संचिकाच पुढे पाठविलेली नाही. ३ (२) ची मान्यता मिळाली असतीतर बीएडचे ट्रेन शिक्षक भरती करून नुकसान थांबविता आले असते. अनेकवेळा पत्रव्यवहार करण्यात आले परंतु सबंधित अधिकारी यांनी संचिका पुढे पाठवलेली नाही. शिक्षण उपसंचालकांनी नोटीस काढली की, तुमची संचिका याठिकाणी आहे घेऊन जावे परंतु संबधीताने लक्ष दिलेले नाही. विद्यार्थ्यांचे नुकसान थांबविण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावे. |
| मा.महापौर | :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| शिक्षण अधिकारी | :मागच्या वर्षी आठवीचे वर्ग उघडण्यात आले डिसेंबरमध्ये ३(१) ची खात्याची मान्यता, मंडळ मान्यतेसाठी प्रस्ताव जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेकडे सादर करण्यात आले आहे. वारंवार तोंडी पाठपुरावा केलेला आहे. मा.महापौर यांनी स्वतः फोन केलेला आहे. |
| श्री.कैलास गायकवाड | :जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांने संचिकेवर स्वाक्षरी केली नसेलतर विभागाने वारंवार पाठपुरावा करायला पाहिजे होता. तो का नाही केला खुलासा करण्यात यावा. |
| शिक्षण अधिकारी | :जि.प.शिक्षण अधिकारी यांचेशी प्रशासनिक चांगले संबध आहे पाठपुरावा वारंवार केला जात आहे. |
| श्री.कैलास गायकवाड | :खात्याची मान्यता मिळाली नाही तर आपोआपच आठवीची मान्यता रद्द होईल. |
| शिक्षण अधिकारी | :वारंवार पाठपुरावा केलेला आहे. जे जे करता येईल ते करेल. वारंवार पाठपुरावा व लेखी पाठपुरावा केलेला आहे. |

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :सदरचे काम प्राध्यानाने करायला पाहिजे होते गंभीरतेने करायला पाहिजे होते. शैक्षणिक वर्ष केव्हा सुरू होते. |
| श्री.कैलास गायकवाड | :याबाबतीत मा.आयुक्तांना माहिती दिली असतीतर संचिकेला मंजूरी मिळाली असती. कार्यवाही कधी करणार एकवर्ष झाले आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :मा.आयुक्तांना आपल्या परिने. |
| मा.महापौर | :मा.आयुक्तांनी खुलासा करण्यात यावा. |
| मा.आयुक्त | :महानगरपालिका १२ शाळेत ८वी ९वी चे तसेच १० वीचे विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. या ठिकाणी बी.एस्सी,बी.एड उमेदवार/ शिक्षक तातडीने भरणे आश्यक होते. वर्षभरात नव्याने भरती होणे अपेक्षीत होते ते झालेले नाही. काही शिक्षकांविरूध्द तक्रारी आल्याने निलंबीत करावे लागले. पाठपुरावा करणे सुरूच आहे. ज्यावेळेस शाळा बांधणे झाल्या त्यावेळेस खात्याने कळविण्यात आले की, मनपाकडे उपलब्ध असलेले पदवीधर,पदव्युत्तर या शिक्षकांना तातडीने शाळेवर देण्यात यावे. दुर्देवाने ते काहीच करण्यात आलेले नव्हते काही शाळांवर होते त्यांनी काम केले. सर्व एक्सरसाईज करण्यात आलेली आहे. या शाळेवर जे शिक्षण द्यावयाचे आहे ते तयार आहे दोन दिवसांमध्ये शिक्षक तिथे रूजू होतील. कायमस्वरूपी जागेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. |
| श्री.सुशिल खेडकर | :मालमत्ता विषयी विषय आहे. ठेकेदाराला नेमूण पीरबाजार येथील विकास करणार होतो ४० ते ४५ ओटे तयार केलेले आहे आणि खुल्या मैदानात पेव्हींग ब्लॉक्स बसविण्यात आलेले आहे तेथे बाजार का नाही भरविला जात. त्या ठिकाणचा बाजार दोन ठिकाणी भरवला जातो सुतगीरणी व मेन रस्त्यावर. सोमवार मंगळवारी बाजार भरविला जातो अर्धी यंत्रणा साफसफाईची मनपाची असते. बाजार संपल्यानंतर राहिलेला कचरा सफाई मनपातर्फे केला जातो. आजुबाजूचे गुंड लोकां तर्फे हप्ता वसुली केली जाते. बाजाराची जागा तयार असून बाजार का नाही भरविला जात खुलासा करण्यात यावा. काही अडचण असेल तर प्रस्ताव तयार करून मा.विभागीय आयुक्तांची परवानगी घेऊ. |
| श्री.कृष्णा बनकर | :रॅम्केबद्दल खुलासा झालेला नाही. रॅम्केची यंत्रसामुग्री, कर्मचारी किती आहे. तसेच मजूरांचे भविष्य निर्वाह निधी भरले जाते किंवा नाही. वार्डात घंटा गाडया नाही. त्यास आमची भाषा कळत नाही. |
| श्री.गजानन बारवाल | :रॅम्केबाबत सर्वांचीच नाराजी आहे. कचऱ्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन होत नाही. यंत्रसामुग्री पुरविण्यात आलेली नाही. प्रशासनाने त्यांना दंड केलेला आहे पेमेंट थांबविलेले आहे, अभिनंदन रॅम्केसंस्थेबद्दल सर्वच नाराज आहेत. लहान मतोठे गाडया दिलेल्या नाहीत. करार रद्द करण्यात यावा. रॅम्केचे व्यवस्थापन योग्य नाही. रॅम्केचा करार अद्यापपर्यंत का रद्द करण्यात आलेला नाही याचा खुलासा करण्यात यावा. |
| सौ.प्रिती संतोष तोतला | :रस्त्यावरील कचरा झाडल्यानंतर तो एका ठिकाणी जमा केला जातो दोन तासांनी वाऱ्याने तो कचरा पुन्हा पसरला जातो. त्यामुळे झाडलेल्याचा काहीही फायदा होत नाही. पाससाळा सुरू झालेला आहे झाडु मारणाऱ्यांचे कचरा उचलण्यासाठी मागे रिक्शा असावी. |

मा.महापौर :रॅम्केला वेळोवेळी समज दिलेली आहे. वेळोवेळी बैठक केली आहे. कायदेशीर बाबी तपासून रॅम्केचा करारनामा रद्द करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :प्रत्येक वार्डात पोलीस चौकी देण्याबाबत पालीस आयुक्तांनी पत्र दिलेले आहे. प्रत्येक वार्डात पोलीस चौकीसाठी जागा देण्यात यावी.

**विषय क्र. 09**

दिनांक 26.04.2010 (का.प.क्र.38), 29.04.2010 (का.प.क्र.01), व 20.05.2010 (का.प.क्र.02), रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभा व विशेष बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.

श्री.गिजाराम हाळनोर : मंजूर करण्यास हरकत नाही दिनांक २०-५-२०१० च्या इतिवृत्तात सभागृह नेता असे म्हटले इतरांची जशी नावे टाकली तसे सभागृह नेता यांचेही नावाचा उल्लेख करावा.

मा.महापौर : दुरूस्ती करावी विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे इतिवृत्त दिनांक 20.05.2010 सभागृह नेता श्री.गिरजाराम हाळनोर या दुरूस्तीसह दिनांक 26.04.2010 (का.प.क्र.38), 29.04.2010 (का.प.क्र.01), व 20.05.2010 (का.प.क्र.02), रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभा व विशेष बैठकीचे इतिवृत्तांत कायम करण्यात येते.

**विषय क्र 10 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दि.7/11/2009 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने आस्थापना विभागास दिलेल्या निर्देशनुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक/ठराविक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-2 व वर्ग-3 संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/ आस्था-1/1892/2009. दि.30/11/2009 रोजीच्या आदेशान्वये दि.5/11/2009 ते दि.3/5/2010 पर्यंत मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-2 व 3 संवर्गात खालील अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहे.

| अ. क्र. | अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ.किरण कावळे | वै.अधि.ठ.वेतन | आरोग्य विभाग | 12000/- प्रतिमाह |
| २. | डॉ.संतोष कस्तुरे | विकृतीशास्त्र अर्धवेळ | आरोग्य विभाग | 5000/- प्रतिमाह |
| ३. | गजानन आढाव | स्व.निरीक्षक | आरोग्य विभाग | 269/- |
| ४. | नंदन संजय महादू | पशुधन पर्यवेक्षक | प्राणी संग्राहलय विभाग | 269/ |
| ५. | पटेल राहूल नटवरलाल | मिश्रक | आरोग्य विभाग | 269/ |
| ६. | दत्ता सरोदे | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांध.विभाग | 269/ |
| ७. | राजू सुरडकर | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांध.विभाग | 269/ |
| ८. | कृष्णा ठोकळ | कनिष्ठ लिपीक | वार्ड-ब कार्यालय | 269/ |
| ९. | देवीदास यु. कुंटे | कनिष्ठ लिपीक | पापु व जलनिःसारण (अ/ड) | 269/ |
| १०. | राजेश पाटील | कनिष्ठ लिपीक | बांधकाम-1 कार्यालय | 269/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | राजेश पगारे | कनिष्ठ लिपीक | बांधकाम-1 कार्यालय | 269/ |
| १२. | विजय हिवराळे | कनिष्ठ लिपीक | शहर अभियंता विभाग | 269/ |
| १३. | विमल चोखाजी साठे | कनिष्ठ लिपीक | विद्युत(इ/फ)विभाग | 269/ |
| १४. | आर.एस.पवार | कनिष्ठ लिपीक | क्रिडा विभाग | 269/ |
| १५. | शफिक अहेमद | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-अ कार्यालय | 269/ |
| १६. | अरूण गुजलेकर | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-अ कार्यालय | 269/ |
| १७. | सय्यदा अफजलुन्नीसा नहेरी | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-अ कार्यालय | 269/ |
| १८. | इकबाल जावेद रज्जाक | कनिष्ठ लिपीक | प्रकल्प विभाग | 269/ |
| १९. | आनंद खरात | कनिष्ठ लिपीक | लेखा विभाग | 269/ |
| २०. | मुक्तेश्वर लोखंडे | कनिष्ठ लिपीक | वाचनालय विभाग | 269/ |
| २१. | बी.के.गायकवाड | कनिष्ठ लिपीक | सुजयो,प्रकल्प विभाग | 269/ |
| २२. | अखिल उर्र रहेमान | कनिष्ठ लिपीक | वार्ड-इ कार्यालय | 269/ |
| २३. | अलका नारायण बोरसे | कनिष्ठ लिपीक | प्रकल्प विभाग | 269/ |
| २४. | भारती जगताप | कनिष्ठ लिपीक | प्रकल्प विभाग | 269/ |
| २५. | प्रभु लक्ष्मण चव्हाण | कनिष्ठ लिपीक | कर निर्धारक व संकलक विभाग | 269/ |
| २६. | मो.मुसा मो.याकूब कुरैशी | कनिष्ठ लिपीक | कर निर्धारक व संकलक विभाग | 269/ |
| २७. | विनोद साळवे | कनिष्ठ लिपीक | जलतरण विभाग | 269/ |
| २८. | मिलिंद विठ्ठल गायकवाड | कनिष्ठ लिपीक | रस्ते,इमारती,उद्यान (वॉर्ड-अ) | 269/ |
| २९. | अफसर सिध्दीकी | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | 269/ |
| ३०. | संगिता थोरात | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | 269/ |
| ३१. | सुभाष धांडे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | 269/ |
| ३२. | अमोल जेवरीकर | कनिष्ठ लिपीक | निवडणूक विभाग | 269/ |
| ३३. | माधुरी शेंदूरकर | कनिष्ठ लिपीक | वार्ड-ड कार्यालय | 269/ |
| ३४. | विजय पाटील | कनिष्ठ लिपीक | वार्ड-फ कार्यालय | 269/ |
| ३५. | अशोक किसनराव जाधव | कनिष्ठ लिपीक | पाणी पुरवठा विभाग (ई/फ) | 269/ |
| ३६. | विनोद वासेकर | कनिष्ठ लिपीक | लेखा परिक्षण विभाग | 269/ |
| ३७. | जावळे रावसाहेब | कनिष्ठ लिपीक | प्राणी संग्रहालय | 269/ |
| ३८. | शे.महेबूब हुसेन | कनिष्ठ लिपीक | उपआयुक्त (सिडको) यांचे दालन | 269/ |
| ३९. | सुभाष नाईक | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड कार्यालय-ड | 269/ |
| ४०. | कु.अर्चना निकाळजे | संगणक ऑपरेटर | लेखा परिक्षण विभाग | 269/ |
| ४१. | श्री.शे.रियाज शे.मुजीबोद्दीन | संगणक ऑपरेटर | संगणक विभाग | 269/ |
| ४२. | सौ.जयश्री झाल्टे | संगणक ऑपरेटर | कार्य.अभियंता(अ व ड) कार्या. | 269/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४३. | पद्माकर जाधव | डार्करूम सहा. | आरोग्य विभाग | 269/ |
| ४४. | अनिल जी.मगरे | अग्निशामक | अग्निशमन विभाग | 269/ |
| ४५. | आरेफ खान मसुद खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ४६. | भगीरथ जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ४७. | हरिश्चंद्र सोनवणे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ४८. | शे.फईम शे.बशीरोद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ४९. | मिलिंद घाटे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५०. | शेख रऊफ शे.माणिक | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५१. | महंमद याहया खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५२. | नजीर खान पठाण | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५३. | जगदीश गायकवाड | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५४. | प्रभु पवार | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५५. | रमेश सिरसाठ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५६. | महादेव मिसाळ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५७. | शेख निजाम शेख दगडू | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५८. | रंगनाथ बकले | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ५९. | गुलाम रसुल खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ६०. | रविंद्र पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ६१. | अरूण बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ६२. | सय्यद फरिदोद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ६३. | सतिश जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | 269/ |
| ६४. | शेख जावेद शे.अमजद | देखरेख करण्यासाठी | बांधकाम-1 विभाग | 269/ |
| ६५. | सर्वेश नांद्रेकर | देखरेख करण्यासाठी | बांधकाम-1 विभाग | 269/ |
| ६६. | मो.रफीयोद्दीन | चित्रपट चालक | पशुधन विकास विभाग | 269/ |
| ६७. | विजय उजीवाल | सर्प पकडणार | प्राणी संग्रहालय विभाग | 269/ |
| ६८. | निकम रामदास नामदेव | लाईफ गार्ड | सिध्दार्थ जलतरण तलाव | 269/ |
| ६९. | रमेश शिंदे | प्लँट ऑपरेटर | पाणी पुरवठा-1 विभाग | 269/ |

तथापी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (1) व (3) नुसार उक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.6/5/2010 पासून पुढील सहा महिन्याकरिता मुदतवाढ देण्याबाब प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>**संवादः**</u>

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

श्री.गिरजाराम हाळनोर :२-३ वेळेस पासून या पदांना तात्पुरती मंजूरी देत आपण पूढे घेवून चाललो आहे. ही पदे आवश्यक असतील तर महापालिकेने अस्थापनेवर कायमस्वरूपी भरावे.

मा.महापौर : सहा महिण्यासाठी या कर्मचा-यांना नियुक्त्या देत आहोत नंतर त्यांना कायमस्वरूपी करण्यात येइल.

श्री.गिरजाराम हाळनोर खरच या कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे का असेल तर तसा प्रस्ताव पुढे ठेवण्यात यावा.

मा.महापौर :तात्पुरती सहा महिण्यासाठी नियुक्ती देत आहोत नंतर त्याचा विचार केला जाईल.

श्री.गजानन बारवाल :महापालिकेत अनेक विभागात अनेक कर्मचारी अस्थायी म्हणून कार्यरत आहे आरोग्य विभागात सेविका अनेक दिवसापासून कार्यरत आहे त्यांना दैनिक वेतनाप्रमाणे पगार न देता मानधन ५००,व महापालिकेतर्फे १००० असे एकूण १२०० ते १७०० वेतन दिले जाते.अनेक वेळा हा विषय आपल्याकडे मांडलेला आहे. पुढील बैठकीत हा विषय सुध्दा घेण्यात यावा.प्राधान्याने घ्यावे सर्वांना सरासरी एकसारखा पगार असावा.

श्री.कैलास गायकवाड : प्रस्तावात वर्ग -२,३ चे कर्मचारी यांचाच उल्लेख केला वर्ग-४ संवर्गातील अस्थायी कर्मचारी यांनाही मुदतवाढ देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक/ठराविक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-2 व वर्ग-3 संवर्गातील प्रस्तावात नमुद विविध संवर्गातील विविध विभागात कार्यरत असलेले व प्रस्तावात नमूद ठरावीक व दैनिक वेतनावर असलेले अनुक्रमांक 1 ते 69 अधिकारी/कर्मचारी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (1) व (3) नुसार दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.6/5/2010 पासून पुढील सहा महिन्याकरिता मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 11** : **नगर रचना विभाग**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरामधील क्रांतीचौक येथे वाहतुक सुरळीत व्हावी व शहरातील नागरीकांना रहदारीचा त्रास कमी व्हावा या करीता उड्डाण पुलाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या मार्फत प्रस्तावित असून उड्डाणपुलाचे काम अधिक गतीने होणे करीता कोटला पाण्याची टाकी ते शासकीय दुध डेअरी क्रांतीचौक या विकास योजने अंतर्गत 45.00 मीटर रुंद रस्त्याने बाधीत शासकीय,निमशासकीय,खाजगी मालमत्ता भूसंपादीत करणे आवश्यक आहे. या बाबत संबंधीत मिळकत धारकांना यापूर्वी भूसंपादनाची प्रक्रीया म्हणून कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. रस्त्याने बाधीत बहुतेक मिळकत धारकांना बाधीत जागेचा मावेजा नियमावली मधील तरतुद प्रमाणे चटई क्षेत्र निर्देशाक स्वरुपात विकास हक्क हस्तांतरण (T.D.R) रोख रक्कम स्वरुपात देणे आहे. या उड्डाणपुलाचे लगतचे रस्त्याचे (Slip Road) काम सुरु असून त्यापैकी क्रांतीचौकाचे पश्चिमेकडील दोन्ही बाजुचे रुंदीकरणाचे काम पूर्ण होत आले आहे. सदर रुंदीकरणात ज्या भूखंडधारकांचे मालमत्ता बाधीत होतात त्यातील बहुतेकांनी पूर्ण सहकार्य करुन रस्ता बाधणीस जागा उपलब्ध करुन दिली आहे. मात्र नगर भूमापन क्रमांक 17364 चे भूखंडधारकांनी खाजगी वाटाघटीने देय टि.डी.आर. किंवा एफ.एस.आय. घेण्यास नकार दिला असून देय पेक्षा जास्त मागणी केली आहे. जी की, नियमानुसार मान्य करता येत नाही. सदर भूखंडाचे बाधीत क्षेत्र संपादीत करणे उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी आवश्यक होते. त्यानुसार रितसर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. त्यास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक 548 दिनांक 16/07/2009 अन्वये मान्यता दिलेली आहे.

क्रांतीचौकाचे पूर्व कडील रस्त्याच्या दक्षिणेकडील जे भूखंड 45.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होतात ते प्रमुख्याने स.क्र. 53 व 54 मधील आहेत व त्यांच्या पी.आर.कार्ड वरील मालकी हक्काच्या नोंदीस स्थगिती देण्यात आलेली आहे. यापैकी स.क्र. 54 हा महानगरपालिकेच्या मालकीचा असल्याने त्यासाठी भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव दिलेला नाही. मात्र ज्या लोकांची नांवे पी.आर.कार्डवर होती त्यांनी रस्ता करु देण्यास अडथळा करुन मा. न्यायालयात दाद मागितली होती. त्याबाबत आवश्यक तो पाठपुरावा करुन ही जागा (स.क्र. 54 मधील) रस्त्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र काही भूखंड हे स.क्र. 53 व 54 अश्या

दोन्हीत विभागले गेले आहेत व त्यांचा रस्त्यात बाधीत होणारा भाग स.क्र. 53 मध्ये येतो त्यामुळे ती जागा ताब्यात घेण्यास अडचण निर्माण होत आहे. यासाठी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करुनही बाधीत क्षेत्र प्राप्त होऊ शकले नाही. त्यासाठी ही रितसर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यामुळे नगर भूमापन क्रमांक 14520 व 14521 यांचे अनुक्रमे 256.00 चौ.मी. व 126.00 चौ.मी. एवढे क्षेत्रासाठी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्याचा प्रस्ताव त्यास येणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरात अनेक रस्ते हे रस्ते विकास मंहामंडळाच्या माध्यमातून होत आहे. अमरप्रीत ते शहानुरवाडी पर्यत रस्ता चार वार्डातून जातो त्यात माझाही वार्ड येतो रस्ते विकास मंहामंडळाने या रस्त्याचे काम केले. यापेक्षा चांगले काम महापालिकेच्या माध्यमातून होवू शकले असते असा कामाचा दर्जा आहे. महानगरपालिका अधिकाऱ्यांनी पाहिले नाही. रत्यावर खडडे पडतील रस्ते विकास महामंडळाने रस्ता केला हे जनतेला माहित नाही.या रस्त्याचे काम चांगल्या प्रतीचे झाले की नाही या बाबत महापालिका प्रशासनाने रस्ते विकास महामंडळाच्या अधिका-याशी जॉईन्ट बैठक घेवून विचारणा केलेली दिसत नाही.काल्र्डा कॉर्नर जवळ याच रस्त्यावर मोठे खडडे पडले पोहण्याच्या तलावा सारखी परीस्थिती आहे आणखी मोठया स्वरूपाचा पाऊस येणार त्यावेळेस या रस्त्याची परीस्थिती भयानक होईल असे चित्र आहे.या संदर्भात मा. आयुक्त यांना दोन पत्र दिले रस्त्यवर लाईट लावले रस्तेविकास महामंडळाच्या मार्फत जरी लावले असेल तर देखभाल दुरूस्ती महापालिकाच करणार आहे.रस्त्याच्या एक साईडला दिव्याची व्यवस्थ करणे आवश्यक आहे दररोज त्या रस्त्यावर अपघात होतात हा रस्ता झाला त्याच प्रमाणे क्रांतीचौक येथील रस्ता रस्ते विकास महामंडळाकडून होत असतांना क्रांतीचौक मध्ये जो रस्ता होतो आहे या रस्त्याखाली जुनी पाण्याची लाईन आहे.ती स्थलांतर करणेसाठी वारंवार पाठपूरावा केला ते काम केले नाही. आता त्या लाईनवर रस्ते विकास महामंडळाने कॉक्रेटींग केले.यानंतर ती लाईन दुरूस्त करण्याची गरज पडल्यास पुर्णपणे खोदावे लागेल. किंवा साईडला लाईन टाकावी लागेल.तसेच ड्रेनेज लाईन ही नाही त्यासाठी पाण्याची लाईन स्थलांतर करणे व ड्रेनेज लाईन टाकणे हे रस्त्याचे काम होण्याच्या अगोदर करण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल :मा.बंड साहेबांनी क्रांतीचौक येथील जागेचे भुसंपादन केले. झाशीची राणी यांचे पुतळया जवळील जागा महापालिकेने ताब्यात घेतली तेथील सर्व तोडून क्लिअेर केली असता त्या जागेचा कब्जा दुस-याला दिलेला आहे.त्या ठिकाणी लागलेला बोर्ड या संदर्भात मी 4 बैठकीपासून बोलतो आहे महापालिकेची जागा ताब्यात असतांना खाजगी मालकाने एक खाजगी सुरक्षा रक्षक ठेवून स्वत:च्या नावाचा तेथे बोर्ड लावलेला आहे.अनेक दिवसापासून हा प्रश्न प्रलंबीत आहे ती जागा ताब्यात घ्यावी.तसेच बाजूला असलेली बँक हा प्रश्न सुध्दा अनेक दिवसापासून प्रलंबीत आहे ती जागा ताब्यात घ्यावी त्या बाबतीत वाटाघाटी केल्यास तो सुध्दा प्रश्न सुटेल आताच म्हटले तेथे ड्रेनेज लाईनच टाकलेल्या नाही हा प्रश्न सुध्दा महत्वाचा आहे त्याची दखल घ्यावी.

श्री.हुशारसींग चव्हाण :शहर सुधार समिती अस्तित्वात आहे असे प्रस्ताव या समितीच्या मार्फतच यावे.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :यानंतरचे प्रस्ताव या समितीच्या मार्फतच येतील. |
| श्री.गिरजाराम हाळनोर | :याच समितीचे नव्हे तर इतर समित्याचे प्रस्ताव सुध्दा त्या त्या समित्यांच्या मार्फत येथे यावे.तसेच आताच अमरप्रित हॉटेल ते दर्गा रस्त्याचा उल्लेख झाला या रस्त्यावर रोपळेकर हॉस्पीटल जवळ जो चौक झाला तेथे गटटू बसविले स्पील होते. एक सारखा पणा नाही अपघात होतात गटटू काढून कॉन्क्रेटींग करावे.हे काम करतांना जवाहर कॉलनी चेतक घोडा कडून येणारे पाणी हे सरळ गुरूजन हॉसींग सोसायटी तेथील दुकानमध्ये जाते साईड नाली नाही. अनेक ठिकाणचे काम बाकी ठेवले. महापालिकेचे अधिकारी व रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी यांची संयुक्त बैठक घेवून ज्या समस्या असतील त्या सोडविण्याचे आदेशीत करावे. |
| श्री.सुरेंद्र कुलकर्णी | :कालच्या पावसाने त्या चौकात नाली झाली वाहतूकीला अडचण येते. काय उपाययोजना करणार आहे. |
| मा.महापौर | :रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी , शहर सुधार समिती सभापती व महापालिकेचे संबधीत अधिकारी यांची बैठक घेवून जे प्रश्न असतील ते विचारात घेवून कार्यवाही केली जाईल. |
| श्री.गिजाराम हाळनोर | :ज्या काही स.सदस्यांनी सुचना केल्या त्याचा अंतर्भाव यात करून हा प्रस्ताव मंजूर करावा. |
| मा.महापौर | :हा विषय मंजूर करण्यात येतो. भुसंपादनाचा तपशिल प्रशासनाने दयावा. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार क्रांतीचौकाचे पूर्व कडील रस्त्याच्या दक्षिणेकडील जे भूखंड 45.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होतात ते प्रमुख्याने स.क्र. 53 व 54 मधील आहेत व त्यांच्या पी.आर.कार्ड वरील मालकी हक्काच्या नोंदीस स्थगिती देण्यात आलेली आहे. (स.क्र. 54 मधील) रस्त्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र काही भूखंड हे स.क्र. 53 व 54 अश्या दोन्हीत विभागले गेले आहेत व त्यांचा रस्त्यात बाधीत होणारा भाग स.क्र. 53 मध्ये येतो त्यामुळे ती जागा ताब्यात घेण्यास अडचण निर्माण होत आहे. यासाठी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करुनही बाधीत क्षेत्र प्राप्त होऊ शकले नाही. त्यासाठी ही रितसर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यामुळे नगर भूमापन क्रमांक 14520 व 14521 यांचे अनुक्रमे 256.00 चौ.मी. व 126.00 चौ.मी. एवढे क्षेत्रासाठी विद्यमान बँकेची जागा भूसंपादनात बाधीत होत असल्यास ती जागा त्यासह भूसंपादन रितसर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्याचा व त्यास येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 12 :** **नगर रचना विभाग**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहर मुळ हद्दीसाठी विकास योजना Notification No. TPS-3073/4259/W-2 दिनांक 6 जानेवारी 1975 रोजी मंजुर करण्यात आली होती. सदर विकास योजनेमध्ये मौजे सातारा या गावातील आताचे गट क्रमांक 28 ते 44 व गट क्रमांक 46 ते 75 हे नगरपालिका हद्दीत समाविष्ट असून ना विकास क्षेत्रात असल्याचे दर्शविण्यात आले होते.

शासन अधिसुचना (नगर विकास विभाग) क्रमांक No. AMC-1082/2007/(i)/UD-21 दिनांक 3 डिसेंबर 1982 नुसार औरंगाबाद शहराची वाढीव हद्द निश्चित करुन औरंगाबाद महानगरपालिका स्थापन करण्यास मान्यता झाली. हद्द वाढीची विकास योजना तयार करण्यासाठीचा

शासनाचा हेतु शासनाचे राजपत्र part-I-A Aurangabad division supplinent date 24 th March 1982 (on page No.69 and 70) नुसार जाहीर करण्यात आला.

औरंगाबाद शहराची मुळ हद्दीतील ना विकास क्षेत्र (म्हणजे सातारा गावातील आताचे गट क्रमांक 28 ते 44 व गट क्रमांक 46 ते 75) यासह वाढीव हद्दीसाठीची विकास योजना नगर विकास विभाग महाराष्ट्र शासनची अधिसुचना क्रमांक No. TPS-3088/454/CR-59/ UD-12 Date 15 October 1991 नुसार मंजुर करण्यात आली.

दरम्यान औरंगाबाद महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली व त्यासाठीची मतदार यादी गट क्रमांक 28 ते 44 व गट क्रमांक 46 ते 75 मधील नागरीकांची नावे समाविष्ट असल्याने व या नागरीकांनी यापूर्वी सातारा ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यासाठी मतदान केले असल्याने हे गट क्रमांक महानगरपालिका हद्दीत समाविष्ट असल्याच्या मुद्दया संदर्भाने मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ,औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रमांक 1234/2010 दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेची सुनावणी दरम्यान सन 1975 ला मंजुर झालेली विकास योजना त्यात विषयांकित गट क्रमांकाचा समावेश महानगरपालिका स्थापन होतांनाचे शासन आदेशात संपूर्ण नगरपालिका क्षेत्राचा उल्लेख, सन 1991 साली मंजुर झालेले या भागासाठीची सुधारीत विकास योजना या सर्व बाबी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशनास आणून देण्यात आल्या. मात्र उक्त मौजे सातारा सर्व्हे क्रमांक /गट क्रमांक 28 ते 44 व 46 ते 75 महानगरपालिका हद्दीत समाविष्ट असल्या बाबतची अधिसुचना सादर करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले तथापी तशी अधिसुचना महानगरपालिका तथा शासनाकडून उपलब्ध होवू शकली नाही. करीता मौजे सातारा सर्व्हे क्रमांक/गट क्रमांक 28 ते 44 व 46 ते 75 महानगरपालिका हद्दीत समाविष्ट असल्या बाबतची अधिसुचना महाराष्ट्र शासनाने एक आठवडयात काढावी असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले होते. या संदर्भाने महानगरपालिकेने शासनास (01) पत्र जा.क्र.मनपा निवडणूक/115/2010 दिनांक 02/03/2010 व (02) पत्र जा.क्र.मनपा/नरवि/नर-2/437/2010,दिनांक 08/03/2010 अन्वये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अधिसूचना काढण्याची विनंती करण्यात आली होती. तथापी तशी अधिसूचना प्रसिध्द न झाल्यामुळे उक्त नमुद गट क्रमांक 28 ते 44 व 46 ते 75 मधील नावे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2010 साली प्रभाग क्रमांक 96 चे मतदार यादी मधुन वगळण्यात आली.

शासनाने पत्र क्रमांक औमपा-2010/261/प्र.क्र.45/नवि-24 नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक 17 एप्रिल 2010 अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे सातारा येथील सर्व्हे क्रमांक 28 ते 44 व 46 ते 75 समाविष्ट करण्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे रिट पिटीशन क्रमांक 1234/2010 दाखल करण्यात आलेली आहे. या याचिकेसंदर्भात मा. उच्चा न्यायालयाने दिलेल्या आदेशानूसार मौजे सातारा सर्व्हे क्रमांक 28 ते 44 व 46 ते 75 हद्दीतील क्षेत्र महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्याबाबतची प्राथमिक अधिसूचना निर्गमित करुन यासंबधात हरकती आणि सूचना मागविणे इत्यादि कार्यवाही सुरु करावयाची आहे.

यास्तव, उपरोक्त सर्व्हे क्रमांक/गट क्रमांक व सातारा गावाचे उर्वरीत क्षेत्र महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्याची प्राथमिक उद्घोषणा काढण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा, असे शासनाने कळविले आहे.

करीता मौजे सातारा सर्व्हे/गट क्रमांक 28 ते 44 व 46 ते 75 हद्दीतील क्षेत्रासह सातारा गावाचे उर्वरीत क्षेत्र महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्याची प्राथमिक उद्घोषणा काढण्यासाठी शासनाकडे सादर करावयाचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.गिरजाराम हाळनोर : विषय क्रमांक १२ च्या बाबतीत पान क्रमांक ५ वर शासनाचे पत्र क्रमांक नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दिनांक १७ एप्रिल २०१० अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे सातारा येथील सर्व्हे क्रमांक २८ ते ४४ व ४६ ते ७५ समाविष्ट करण्या संदर्भात मा.उच्च

न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे रिट पिटीशन क्रमांक १२३४/२०१० दाखल करण्यात आलेली आहे. या याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मौजे सातारा सर्व्हे क्रमांक २८ ते ४४ व ४६ ते ७५ हद्दीतील क्षेत्र महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्याबाबतची प्राथमिक अधिसूचना निर्गमित करून यासंबधात हरकती आणि सूचना मागविणे इत्यादि कार्यवाही सुरू करावयाची आहे असे लिहिलेले आहे. पुढे यास्तव, उपरोक्त सर्व्हे क्रमांक/गट क्रमांक व सातारा गावाचे उर्वरीत क्षेत्र म्हणजे पुर्ण गांवच मनपामध्ये समावेश करणार आहे का? खुलासा करण्यात यावा यामध्ये काही न्यायालयीन प्रकरण आहे काय?

श्री.कैलास गायकवाड : त्या भागामध्ये महानगरपालिका मालमत्ताची वसुली, गुंठेवारी, पाणीपट्टी तसेच विकास कामासाठी करोडो रूपये खर्च केलेले आहे. मा.न्यायालयात जागेविषयी रिट याचिका दाखल झालेली होती निवडणुकीच्या काळात मनपास मा.न्यायालयाने विचारणा केली की, मनपाची हद्द काय? त्या नंतर बरीच चर्चा झाली, मतदानामध्ये १५०० ते १६०० ओव्हर लॅपिंग मतदान झाले होते त्यात सातारा ग्रामपंचायत आणि औरंगाबाद महानगरपालिका या दोन्ही ठिकाणी मतदानाचा हक्क बजावत होते. मा.न्यायालयाने मनपास तुमची हद्दी काय असे कळविलेले आहे. आठ दिवसांतच नोटिफिकेशन काढावे अशा सुचना होत्या. नोटिफिकेशन काढणे गरजेचे होते ते काढण्यात आलेले नाही. सातारा येथील गट नंबर २८ ते ४४ व ४६ ते ७५ आजच्या स्थितीत ग्रामपंचायतीच्या हद्दीत आहे. तिथे महानगरपालिकेच्या वार्डाची निवडणूक घेतलेली आहे हे चुकीचे आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी चोखपणे काम बजावलेले नाही. मा.न्यायालयाने मा.आयुक्तांनी जी कार्यवाही करण्यास त्यावेळी सांगण्यात आले होते ते केले नसल्यामुळे जे नगरसेवक न म्हणता ग्रामपंचायते सदस्य म्हणून संबोधले पाहिजे. त्याठिकाणी पुन्हा निवडणूका घेण्यात याव्यात व संबधीत प्राधिकृत अधिकारी यांची सखोल चौकशी करावी व मा.आयुक्तांनी योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :हा वाद अनेक दिवसांपासून चालू आहे. रिट पिटीशन मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले आहे. मा.न्यायालयाने सूचना केल्या होत्या की, याची दखल घेऊन बॉन्ड्री फिक्स करा. ते काम झाले. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार ते काम लवकर व्हावे. निवडणूका संपलेल्या आहे हया गोष्टीला स्थगीती देण्यात यावी अशी विनंती आहे.

मा.महापौर :सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने हया प्रस्तावास स्थगीती देण्यात येते.

श्री.कैलास गायकवाड :प्राधिकृत अधिकारी यांची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगिती देण्यांत आली.

**विषय क्र. 13 :** **नगर रचना विभाग**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद रेल्वेस्थानका समोर मिळकत नगर भूमापन क्रमांक 19080 या ठिकाणी मशिदीचे आवारात 35.00 मीटर रुंद (उत्तर दक्षिण) विकास योजना रस्ता व 40 मीटर रुंद (पूर्व-पश्चिम) विकास योजना रस्ता या दोन्ही रस्त्याच्या वळणावर

अस्तित्वातील जुना पेट्रोल पंप असून सदरील पेट्रोल पंप व डिझेल पंप हा अग्निशमन विभागाचे पत्र जा.क्र/मनपा/अशाद/79/2004 दिनांक 09/01/2004 नुसार धोकादायक घोषित करण्यात आला आहे. व सदर पेट्रोल पंप परवाना रद्द करण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे गृह विभागानेही आदेशीत केले आहे. सदर पेट्रोल पंप बंद करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 376/अ नुसार दिनांक 10/10/2007 रोजी नोटीस दिली असता सदर नोटीस विरुध्द श्री.रुमी प्रिंटर यांनी दाखल केलेल्या रिट क्रमांक 5872/2007 मध्ये मा.उच्च न्यायालयाने सदरील पेट्रोल पंपाच्या जागेच्या ताब्यात पेट्रोलपंप कामात हस्तक्षेप करण्यास दिनांक 06/10/2007 रोजी महानगरपालिके विरुध्द प्रतिबंधात्मक आदेश पारित करुन पूढील आदेशापर्यंत अंतरीम मनाई हुकूम दिला. सदरील अंतरीम हुकूम मागे घेण्यासाठी महानगरपालिकेतर्फे मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक 4194/2008 दाखल केले असता मा.उच्च न्यायालयाने शासनाने जागेचे संपादन करुन रस्ता रुंदीकरणासाठी कायदयानुसार कार्यवाही करुन जागा ताबा घेण्यास उक्त नमुद आदेशाचा प्रतिबंध होणार नाही असे आदेश दिनांक 17/06/2008 रोजी पारीत करुन सिव्हील ॲप्लीकेशन निकाली काढले.

उपरोक्त सिव्हील ॲप्लीकेशन निकाली काढले असले तरी मुळ रिट याचिका क्रमांक 5872/2007 ही मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. सदरील रिटमध्ये पुढील आदेशापर्यंत मनाई हुकूम आहे. ताथापि सदरील जागेचा ताबा घेणेसाठी कायदेशीर पध्दतीचा अवलंब करुन कार्यवाही करण्यास मा.उच्च न्यायालयाचा प्रतिबंध नाही.

रहदारीस होणारा अडथळा,धोकादायक परिस्थितीचा विचार करता व मा उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता या प्रकरणी उक्त नमुद मिळकत नगर भूमापन क्रमांक 19080 सह 40.00 मीटर विकास योजना रस्त्याने बाधीत होणाऱ्या मिळकतीसाठी भूसंपादनाचा रितसर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणेसाठी व त्यास येणाऱ्या भूसंपादन खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :रेल्वेस्टेशन समोरील हा भाग आहे तेथील लॅन्ड ॲक्वेजिशन करावे. पेट्रोल पंप व मशिदचा काही भाग लॅन्ड ॲक्वेजिशन करायचे आहे. अनेक दिवसांपासून बाबा पेट्रोल पंप ते रेल्वेस्टेशनचा भाग ताब्यात घ्यावा अशी भुमिका अनेक दिवसांपासून आहे. याबाबतीत कुठलीही कार्यवाही झालेली नाही. कार्यवाही करण्यात यावी. काम अद्यापपर्यंत पेडिंग आहे. MTDC चे काम पेडींग पडलेले आहे. तरतुद पैसा उपलब्ध आहे अशी मा.आयुक्तांनी कबुली दिलेली आहे. पेट्रोल पंप व मशिदचा काही भाग ताब्यात घ्यायचा असेल तर चर्चा करून पैसा आहे का? योग्य प्रकारे काम होत असेल, मोबदला देता येत असेल तरच काम हाती घेण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :भुसंपादनाचे जे प्रस्ताव येतात भुसंपादनासाठी खर्च किती येणार याची माहिती हवी.

श्री.विकास जैन :स.सदस्यांनी भुसंपादनाबाबत चर्चा केलेली आहे. मनपाच्या माध्यमातुन मागील तीन ते चार वर्ष ४० मीटरचा रोड वाईडिगचे काम केलेले आहे. शहरात येतांनाच रस्त्यावरून हे शहर कसे असेल याची जाणीव होती. परिपुर्ण रोड साइडड्रेन अद्यापपर्यंत झाले नाही. भुसंपादन करण्यास काही प्रमाणात लोक तयार आहे परंतु प्रशासनातर्फे कार्यवाही झालेली नाही. रेल्वेस्टेशन येथे दररोज अपघात होतात. रेल्वेस्टेशन येथील ४० मिटर आणि ३० मिटरचा रस्ता आहे त्याची काळजी घेतली पाहिजे. महापौर निवासस्थान काळजी घ्यावी, आगामी अर्थसंकल्पात रेल्वेस्टेशन

ते क्रांतीचौक, रेल्वेस्टेशन ते बाबा पेट्रोलपंप येथील रस्ते आपल्या कारकिर्दीमध्ये चांगल्याप्रकारचे झाले पाहिजेत.

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद रेल्वेस्थानका समोर मिळकत नगर भूमापन क्रमांक 19080 या ठिकाणी मशिदीचे आवारात 35.00 मीटर रुंद (उत्तर दक्षिण) विकास योजना रस्ता व 40 मीटर रुंद (पूर्व-पश्चिम) विकास योजना रस्ता या दोन्ही रस्त्याच्या वळणावर अस्तित्वातील जुना पेट्रोल पंप यांचे मिळकती संदर्भात मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे सिव्हील अ.क्र. 4194/2008 मध्ये मा.उच्च न्यायालयाने शासनाने जागेचे संपादन करुन रस्ता रुंदीकरणासाठी कायदयानुसार कार्यवाही करुन जागा ताबा घेण्यास उक्त नमुद आदेशाचा प्रतिबंध होणार नाही असे आदेश दिनांक 17/06/2008 रोजी पारीत करुन सिव्हील ॲप्लीकेशन निकाली काढले. रहदारीस होणारा अडथळा,धोकादायक परिस्थितीचा विचार करता व मा उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता या प्रकरणी उक्त नमुद मिळकत नगर भूमापन क्रमांक 19080 सह 40.00 मीटर विकास योजना रस्त्याने बाधीत होणाऱ्या मिळकतीसाठी भूसंपादनाचा रितसर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणेसाठी व त्यास येणाऱ्या भूसंपादन खर्चासह प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 14 :** **शहर अभियंता विभाग**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, रस्त्यावर /उघडयावर होणारी मांस विक्री बंद करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असल्यामुळे महानगरपालिकेच्या मालकीची ज्या ज्या ठिकाणी मोडकळीस आलेली दुकाने आहेत. ती पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने बांधणे आणि ज्या ठिकाणी नुतणीकरण करणे आवश्यक आहे. त्या दुकानांचे नुतणीकरण करुन सर्वसोयी सुविधायुक्त अद्यावत दुकाने/मार्केट उपलब्ध करणे बाबत निर्णय घेण्यात आला आहे. शहरातील विविध ठिकाणची बीफ आणि मटनची मोडकळीस आलेल्या दुकानांच्या इमारती पाडून त्या ठिकाणी नवीन इमारती बांधणेच्या प्रस्तावापैकी सिल्लेखाना येथील मोडकळीस आलेले जुने बीफ मार्केट पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने बांधणेचा हा एक प्रस्ताव आहे. जुनी मोडकळीस आलेली इमारत आहे. त्या स्थितीत पाडून व्यर्थ व उपयोगी साहित्याची व्हिल्हेवाट लावून जागेचे सपाटीकरण करणेस स्वतंत्र जाहीर निविदा मागविणेस आणि उपलब्ध होणाऱ्या जागेवर नवीन बीफ मार्केट बांधणेच्या कामाचे सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रु. 32,13,833/- प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

श्री.रेणुकादास वैद्य :मागच्या पंचवार्षिकमध्ये सिल्लेखाना येथे मांस विक्री होऊ नये गो हत्त्या होऊ नये म्हणुन १२ सुरक्षारक्षक नेमले होते. स्वातंत्र्यविर सावरकरांच्या पुतळयापर्यंत रक्ताचे पाट वाहत होते. तत्कालिन आयुक्तांनी भेट देऊन सुरक्षा रक्षकांची नेमणुक करून अशा प्रकारची कत्तल होउ नये लाखो रूपये खर्च करून शहराबाहेर स्लॉटर हाऊस तयार करण्यात आले. त्याची परिस्थिती आज काय आहे. जो विषय आपणच बंद केला त्यास पुन्हा सुरूवात करायची हे योग्य वाटत नाही.

श्री.गजानन बारवाल :सिल्लेखाना हा अतिशय जुना व वादाचा विषय आहे. सिल्लेखाना येथील कत्तलखाना हा स्थलांतर केलेला आहे. पडेगांव येथे करोडो रूपये खर्च करून १० एकर जागा उपलब्ध करून दिलेली आहे. सर्व सुविधा देण्यात आलेल्या आहे. पुन्हा सिल्लेखाना येथे मार्केट बनवत असाल तर ते योग्य नाही. बिफ मार्केट असेल मटन मार्केट करू नये. रद्द करण्यात यावे.

मा.महापौर :सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे व ३५ लाख रूपये आहे इतर विकास कामांवर खर्च करावा.

**ठराव :**

सदर प्रस्ताव रद्द करण्यास आणि या प्रस्तावातील आर्थिक तरतुद इतर विकास कामावर खर्च करण्यास मंजूरी देण्यात येते.

## पुरवणी विषय

**विषय क्र.15:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद फिस्ट बॉल असोसिएशन तर्फे बार्सिलोना,स्पेन येथे संपन्न होणाऱ्या युथ फिस्ट बॉल वर्ल्ड चॅम्पीयनशिप साठी निवडण्यात आलेल्या भारतीय टीमचे प्रशिक्षण शिबीर औरंगाबाद येथे होत आहे. सदरील शिबीरासाठी रु.1,24,300/-(एक लाख चोवीस हजार तीनशे फक्त) खर्च येणार आहे. सदरील स्पर्धेचे महत्व लक्षात घेता औरंगाबाद महानगरपालिके मार्फत या शिबीरासाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत करण्याच्या प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.गिरजाराम हाळनोर अनुमोदक :श्री.सुशील खेडकर
श्री.बारवाल गजानन रामकिसन श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

श्री.गजानन बारवाल :स्पोर्टस्मनला मनपाने मदत केलेली आहे काही खेळाडु बाहेर खेळण्यासाठी जात असतात त्यांना आर्थिक मदत करतो. तरी शिबीरासाठी रूपये १२४३००/- मदत देण्यात यावी हि विनंती.

श्री.त्र्यंबक तुपे :पैसे देण्यास हरकत नाही पण येणाऱ्या सदस्यांकडे अशे अनेक प्रस्ताव येतील आणि मनपाची आर्थिक स्थिती पहाता ते परवडणार नाही. किमान ५००००/- मदत करण्यास हरकत नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :५००००/- देण्यास हरकत नाही.

मा.महापौर :युथ फिस्ट बॉल वर्ल्ड चफम्पीयनशिपसाठी ५००००/- मदत करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे औरंगाबाद फिस्ट बॉल असोसिएशन तर्फे बार्सिलोना,स्पेन येथे संपन्न होणाऱ्या युथ फिस्ट बॉल वर्ल्ड चॅम्पीयनशिप साठी निवडण्यात आलेल्या भारतीय टीमचे प्रशिक्षण शिबीर औरंगाबाद येथे होत आहे. सदरील शिबीरासाठी रु.50,000/-(अक्षरी रूपये पन्नास हजार) आर्थिक मदत देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.16 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, 1)पडेगांव व मिटमिटा प्रभागाचा भाग बराच मोठा असून येथील पुर्वीची लोकसंख्या फार कमी होती.त्यामुळे त्या वेळी नागरीकांना पीण्याचे पाणी मिळत होते. पडेगांव मिटमिटा प्रभागात येणारे पाणी हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पाण्याच्या टाकीतून 150 व्यासाच्या पाईप लाईन द्वारे येते. ते पाणी नंदनवन कॉलनी भुजबळ नगर येथुन पडेगांवाला व पडेगावातून मिटमिटयास जाते. त्या 150 व्यासाच्या लाईन वरती बरेचशे नळ कनेक्शन जोडले आहेत त्या वेळची लोकसंख्या व आताच्या लोकसंख्येत खुप वाढ झालेली आहे. त्यामुळे नळ कनेक्शनही वाढले आहेत.

त्यामुळे पडेगांव पर्यंत पाणी येते परंतु पडेगांव माथा व मिटमिटा येथे पाणी पूरवठा होत नाही टाकीत पाणी चढत नाही. करीता पडेगांव मिटमिटयासाठी समांतर जलवाहीनीतून बाबा पेट्रोल पंपा कडून पडेगांव मिटमिटा पर्यंत 450 व्यासाची मोठी पीण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्यात यावी

व हि लाईन जमीनी खालुन न टाकता जमीनी वरती पीलर घेऊन टाकण्यात यावी म्हणजे पिण्याच्या पाईप लाईन वरती अनाधिकृत नळ कनेक्शन होणार नाही व नागरीकांना मुबलक पाणी मिळेल.
2)पडेगांव प्रभाग क्र.8 येथील स्मशानभुमी हि पंधरा वर्षापूर्वी बांधण्यात आलेली आहे. ती स्मशानभुमी नाल्यात व खोल जागेवरती आहे. येथे अंत्यविधी करण्यास फार त्रास होतो कारण पावसाळयाचे दिवसात नाल्यास पूर येतो व संपूर्ण पाणी स्मशान भूमीत घुसते ते पाणी दहण स्टॅन्ड पर्यंत जाते त्यामुळे अंत्यविधी करता येत नाही. तसेच खाली स्मशानभूमीस जाण्या करीता रस्ता नाही त्यामुळे अंत्यविधीस जाताना प्रेताची अवहेलना होते. स्मशान भूमीत बसण्याची व्यवस्था नाही. 3)पडेगांव येथे विद्यार्थी संख्या तसेच नागरीकांची सतत मागणी आहे
की पडेगांव येथे वाचनालय उघडण्यात यावे व या वाचनालयामध्ये विविध वर्तमानपत्रे (लोकसत्ता,महाराष्ट्र टाईम्स,टाईम्स ऑफ इंडिया, समाचार, सामना, सकाळ, सांजवार्ता, सांजशक्ती,लोकमत विविध मासिके, दिवाळी अंक, ग्रंथ, कांदबऱ्या, महिलानसाठी मासिके (गृहशोभीका, तानीष्का) ई.) साप्ताहीके ठेवण्यात यावी अशी नागरीकांची मागणी आहे. करीता या भागामध्ये वाचनालय स्थापन करावे.4)माझे वार्ड क्र.08 मिटमिटा येथे महानगरपालिकेची पहीली ते दहावी पर्यंत शाळा आहे. परंतू शाळेची इमारतीतील खोल्या आपून्या पडत आहेत व आता जी शाळा आहे ती मिटमिटा येथे मुंबई महामार्गावरती आहे. शाळेतील लहान मुले रस्ता ओलांडताणा अपघात होतात या शाळेत 700 विद्यार्थी आहेत. त्यांना बसण्याची व्यवस्था होत नाही. तसेच शाळेला कवायत घेण्यासाठी व विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी ग्राऊंड नाही. करीता मिटमिटा भागामध्ये शासनाची (सरकारी गायरान) जमीन बरीचशी उपलब्ध आहे.करीता याच भागातील गट न.307 मधील पाच एकर जागा ही महानगरपालिकेच्या शाळेस देण्यात यावी. म्हणजे विद्यार्थ्यानची गैरसोय होणार नाही.5)पडेगांव वार्ड क्र.आठ येथे लोकसंख्या 20 ते 25 हजाराचे घरात आहे. येथे हातावर काम करुन उपजिविका करणारा मजूर वर्ग बऱ्याच प्रमाणात आहे. त्यांना आरोग्य केंद्राची सुविधा नाही महागडे दवाखाने परवडत नाही करीता या भागामध्ये एक दहा खाटाचे आरोग्य केंद्र पडेगांव गावमधील हनुमान मंदिरा शेजारी उभारण्यात यावे म्हणजे पडेगांव व मिटमिटा गावातील स्लम भागातील नागरीकांना गैरसोय होणार नाही.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्रीमती सविञिबाई हिरालाल वाणी अनुमोदक :श्रीमती प्राजक्ता विश्वनाथ राजपूत.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे 1) पडेगांव मिटमिटयासाठी समांतर जलवाहीनीतून बाबा पेट्रोल पंपा कडून पडेगांव मिटमिटा पर्यंत 450 व्यासाची मोठी पीण्याच्या पाण्याची भुमिगत पाईप लाईन टाकण्यास 2)पडेगांव येथील स्मशान भुमिस जाण्यायेण्याकरीता रस्ता तयार करणे व स्माशनभुमीत बसण्याची व्यवस्था करणेच्या कामास 3) पडेगांव येथे वाचणालय स्थापन करणे 4) मिटमिटा येथील गट नं 307 मधील 5 एकर जागा ही मनपाच्या शाळेस देण्यास आणि या 6) पडेगांवातील हनुमान मंदिराशेजारी 10 खाटाचे आरोग्य केंद्र उभारणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.17:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.19 शिवनेरी कॉलनी प्रभागात महादेव मंदिराच्या खुल्या जागेत महापालिकेतर्फे बऱ्याच वर्षापुर्वी पाण्याची टाकी बांधलेली आहे. सदरील टाकी जुनी झाली असून विविध ठिकाणी गळत आहे. सदरील खुल्या जागेत लहान मुले खेळत असतात टाकी जुनी असल्याने कधीही पडून जिवीत हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता सदरील पाण्याची टाकी कायमस्वरुपी काढण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.अनिल जैस्वाल अनुमोदक :सौ.प्राजक्ता विश्वनाथ राजपुत

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. 19 शिवनेरी कॉलनी येथील पाण्याची टाकी कायमस्वरुपी काढूण टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.18</u>**:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, फत्तेसिंगपुरा रहेमानिया कॉलनी,नेहरु नगर,बाबर कॉलनी येथील मुस्लिम बांधवाना जवळपास कुठेच कब्रस्थान नाही त्यामुळे त्यांना खुपच त्रास होत आहे. या ठिकाणी महानगरपालिकेची साडेतीन एकर जागा आहे.त्यामध्ये पाण्याची टाकी व शाळा आहे.बाकी शिल्लक जागेवर अतिक्रमण होऊन काही जागा शिल्लक आहे. करीता कब्रस्थानला जागा देण्यासाठी खालील ठराव सर्वसाधारण सभेत ठेवून मंजुर करण्यात यावा.

बाबर कॉलनी,फत्तेसिंगपुरा,रहेमानिया कॉलनी,नेहरुनगर येथील मुस्लिम बांधवाना कब्रस्थान साठी जागा नसल्याने फत्तेसिंगपुरा या ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीच्या साडेतीन एकर जमीनीमधुन दीड एकर जमीन उपलब्ध करुन देण्यात यावी.

सुचक :श्री.सुरेश इंगळे अनुमोदक :श्री.बोराडे रामदास काशीनाथ
श्री.घोडिले आनंद राधाकिसन

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर करण्यात येतो

श्री.सुरेश इंगळे :महानगरपालिकेने अतिक्रमण काढावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फत्तेसिंगपुरा/हत्तेसिंगपुरा या ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीच्या साडेतीन एकर जमीनीमधुन दीड एकर जमीन मुस्लीम कब्रस्थानसाठी उपलब्ध करुन देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>ऐनवेळचे विषय</u>**

**<u>विषय क्र.19 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, केंद्र शासनाच्या सुचने नूसार शहर स्वच्छता आराखडा तयार करण्यासाठी देशातील 423 नगरांची निवड केली आहे. त्यात औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश आहे. सदर आराखडा तयार करण्यासाठी स्वच्छतेची संकल्पना म्हणजे फक्त झाडलोट करणे आणि कचरा उचलणे नव्हे तर संपूर्ण शहरवासीयांचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सर्व संबंधित घटक उदा. शुध्द पाणी पुरवठा, सांडपाणी/शौचालय व्यवस्थापन,भूमिगत आणि खुली गटारींची देखभाल,घन कचरा व्यवस्थापन,पर्यावरण संवर्धन अशा अनेक घटकांचाही समावेश आहे.

भविष्यात शहराच्या गरजा कोणत्या आहेत हयाचा वेध घेण्यासाठी आज उपलब्ध भौतिक सुविधांची स्थितीचे सर्वसमावेशक सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. असे सर्वेक्षण करण्यासाठी एका नामांकीत संस्थेची नियुक्ती करावी लागणार आहे. त्यासाठी जाहिर निविदेचा मसूदा शासनातर्फे प्राप्त होणार आहे

स्वच्छता आराखडयाची अंमलबजावणी करण्यासाठी "शहर स्वच्छता कार्यबल समिती" स्थापन करणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक प्रभागात स.न. च्या अध्यक्षतेखाली प्रभाग स्वच्छता समितीची स्थापना व्हावी असे अपेक्षित आहे. या शहराचे एका नामांकित व्यक्ती ज्यांच्या मताला शहरात मान आहे अशा व्यक्तीची "शहर स्वच्छता राजदूत" म्हणून निवड करावी असे शासनाचे आदेश आहेत. स्वच्छता आरखडयाच्या अंमलबजावणी करण्यासाठी "कार्यबल समितीची" स्थापना खालील मान्यवरां मधून करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर समितीचे अध्यक्ष मा.महापौर तर निमंत्रक आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद हे असतील इतर सदस्य खालील क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती असावेत.

शहर कार्यबल समितीत

01. मा.महापौर -अध्यक्ष
02. आयुक्त मनपा- निमंत्रक
03. उद्योजकाचे प्रतिनिधी- सदस्य

04. स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी- सदस्य
05. कचरा वेचक प्रतिनिधी- सदस्य
06. कामगार संघटनेचा प्रतिनिधी- सदस्य
07. झोपडपट्टीवासीयांचा प्रतिनिधी
08. सह.गृह निर्माण संस्थेचा प्रतिनिधी
09. शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर
10. स्वच्छता क्षेत्रात काम करणारे कंत्राटदार
11. स.सभापती आरोग्य समिती
12. सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी
13. व्यापारी संघटना प्रतिनिधी
14. कॅन्टॉनमेंट बोर्ड प्रतिनिधी
15. राज्य शासनाचा अधिकारी
16. केंद्र शासनाचा अधिकारी
17. मनपाचे शहर अभियंता व सर्व कार्यकारी अभियंते
18. आरोग्य वैद्यकीय अधिकारी
19. घन कचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख

**कार्यबल समितीच्या जबाबदाऱ्या**

1. शहरातील सर्व सहभागी घटक/नागरिक यांच्यामध्ये जगजागरण करणे.
2. यशस्वी अंमलबजावणी,सेवाभावी संस्था/शासकीय यंत्रणेने करारबध्द केलेल्या खाजगी यंत्रणा यांनी तयार केलेले अहवाल/प्रगती अहवाल यांना मंजुरी देणे.
3. स्वच्छता अंमलबजावणी यंत्रणेने तयार केलेल्या प्रारुप शहर स्वच्छता आराखडयास नागरिकांशी विचारविनिमय करुन माहिती देणे.
4. शहर स्वच्छता आराखडा अंमलबजावणीच्या प्रक्रियेवर प्रगतीवर पर्यवेक्षण करण्यासाठी वेळोवेळी क्षेत्रिय भेटी देणे.
5. शहर स्वच्छता आराखडयाच्या अंमलबजावणी आणि प्रगतीबाबत वृत्तपत्र/प्रसारमाध्यम यांना माहिती देणे आणि राज्य शासनास प्रगती अहवाल सादर करणे.
6. अंमलबजावणी यंत्रणेस सर्वतोपरी मार्गदर्शन करणे.
7. संपूर्ण शहर स्वच्छता राखण्यासाठी कायम स्वरुपी जाबादाऱ्या निश्चित करण्याबाबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेला शिफारस करणे.
8. शहर स्वच्छता आराखडयाचे नियोजन आणि अंमलबजावणी करीता मार्गदर्शन आणि संनियंत्रण करण्यासाठी शहर कार्यबल समितीची औपचारीक बैठक वारंवार आयोजित करावी लागेल.
9. नंतरच्या कालावधीत आवश्यकते नुसार बैठकी/क्षेत्रिय भेटी आयोजित करण्यात याव्यात.
10. आवश्यकता भासल्यास कार्यबल समिती आपल्या भूमिका व जबादाऱ्या यांचेवर अधिभर देण्याच्या हेतूने विविध मुद्यांसाठी उपसमिती स्थापन करु शकेल अशा उपसमित्या स्थापन केल्या तरी मुख्य समितीची संपूर्णतः जबाबदारी असेल.
11. शहर स्वच्छता आराखडयाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यबल समितीने शहर स्वच्छता अंमलबजावणी यंत्रणेची नेमणूक करणे आवश्यक आहे.
12. ही यंत्रणा संपूर्ण शहराच्या स्वच्छता कार्यक्रमासाठी दैनदिन समन्वय,व्यवस्थापन व अंमलबजावणीसाठी जबाबदार राहील.
13. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी शहर स्वच्छता कार्यबल समिती आणि अंमलबजावणी यंत्रणेची नेमणूक केल्याबाबत औपचारिक प्रसिध्दी द्यावी.

14. केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या योजनाबाबत नियोजन आणि वित्तीय उपलब्धता याची जबाबदारी.
15. झोपडपट्टी आणि तत्सम भागात तसेच शहरी गरीब यांच्यासाठी सुविधाच्या उपलब्धते मध्ये सुधारणा करणे तसेच सुविधांची देखभाल दुरुस्तीची व्यवस्था करण्याची जबाबदारी असेल.

मा.महापौर : सदस्यांची नांवे निश्चित करण्याचा अधिकार महापौर व मा.आयुक्तांना राहील व महानगरपालिकेचे प्रमुख पदाधिकारी सल्लागार म्हणून राहातील यासह मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वच्छता आराखडयाची अंमलबजावणी करण्यासाठी "शहर स्वच्छता कार्यबल समिती" स्थापन करणेस तसेच या शहराचे एका नामांकित व्यक्ती ज्यांच्या मताला शहरात मान आहे अशा व्यक्तीची "शहर स्वच्छता राजदूत" म्हणून निवड करण्यास तसेच स्वच्छता आरखडयाच्या अंमलबजावणी करण्यासाठी "कार्यबल समितीची" स्थापना करण्यासाठी व कार्यबल समितीचे प्रस्तावात नमुद विविध संस्था ई.चे प्रतिनिधींची नांवे निश्चित करण्याचा अधिकार मा.महापौर व मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना राहील महानगरपालिकेतील उपमहापौर, सभापती स्थायी समिती, सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता हे सल्लागार राहतील. यासह मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 20:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका शालेय गणवेश विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेअंतर्गत प्रतिवर्षी महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना 02 रंगीत व 01 पांढरा गणवेश दिला जातो. तसेच विद्यार्थी कल्याण योजनेतून रेक्झिन व कॅनवॉस शुज,पांढरे व रंगीत सॉक्स आणि नेकटाय देण्यात येतो.

शिक्षण विभागाने सन 2010-2011 या वर्षाकरिता मार्च 2010 विद्यार्थी पटसंख्या 11,913 मुले व 11,724 मुली अशी एकूण 23,637 या विद्यार्थी संख्यनुसार मागील शिल्लक साठा विचारात घेवून खालील प्रमाणे साहित्याची मागणी संख्या नोंदविलेली आहे.

| अ.क्र | साहित्याचे नांव | मागणी संख्या | अ.क्र. | साहित्याचे नांव | मागणी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 01 | रंगीत गणवेश (मुले) | 23,217 | 02 | रंगीत गणवेश (मुली) | 22,647 |
| 03 | पांढरे गणवेश (मुले) | 11,639 | 04 | पांढरे गणवेश (मुली) | 10,844 |
| 05 | रेक्झिन शूज (मुले) | 11,184 | 06 | रेक्झिन शूज (मुली) | 11,377 |
| 07 | कॅनवॉस शुज (मुले) | 11,913 | 08 | कॅनवॉस शुज (मुली) | 10,704 |
| 09 | रंगीत सॉक्स | 23,637 | 10 | पांढरे सॉक्स | 23,637 |
| 11 | नेकटाय | 11,013 | | | |

उद्योग,उर्जा व कामगार विभाग,महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.भांखस-2009/(प्र.क्र. 30) उद्योग-4, दिनांक 08.12.2009 अन्वये मे.कलावती महिला मंडळ,ठाणे या संस्थेस तयार शालेय गणवेश याबाबीसाठी आरक्षण देण्यात आले आहे. त्यानुसार त्यांचेकडून तयार शालेय गणवेश खरेदीकरीता कार्यवाही करण्यात येईल. आणि इतर साहित्य (रेक्झिन व कॅनवॉस शुज,रंगीत व पांढरे सॉक्स आणि नेकटाय) याकरिता निविदा मागवून साहित्या खरेदी करण्यांत येईल.

शिक्षण विभागाने दिलेल्या मागणी संख्येनुसार साहित्य खरेदी करण्यात येईल. याकरिता अपेक्षित रु.2.50 कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. गजानन बारवाल :प्रत्येक वर्षी शालेय विदयार्थ्यांना 2 गणवेश व एक पांढरा गणवेश देत असतो.हे गणवेश देणे अतिशय चांगले असून वेळेवर दयायला पाहिजे.आपण प्रयत्न करतो प्रशासनाने सुध्दा प्रयत्न केला

आहे.बन्सीलाल नगर शाळेमध्ये दोन खोल्यामध्ये शाळेचे बुट,ड्रेस, व इतर साहित्य पडलेले आहे विल्हेवाट लावणार आहात की नाही हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे.ते अदयाप का वाटप केले नाही. त्याचा लेखाजोखा आहे असेल तर माहिती देण्यात यावी.मागच्या वर्षी पण ते तसेच पडून राहिले. हे साहित्य घेण्यास हरकत नाही परंतु जे आहे ते वापरण्यात यावे. नसता त्यांचे काय करणार माहिती दयावी.शाळेच्या 2 खोल्या 10 दिवसात रिकाम्या कराव्यात.

श्री.रेणुकादास वैद्य :आताच म्हटले अनेक काही साहित्य शिल्लक पडून आहे.शाळेतील पटसंख्या जी घेतली जाते व दाखवली जाते यात घोळ असतो याकडे विशेष लक्ष प्रशासनाने दयायला पाहिजे पटसंख्या 80 असेल तर 373 अशी फुगवून का दाखवली जाते कारण समजले नाही त्यामूळे जास्तीचे साहित्य खरेदी होते व त्यात महापालिकेचा विनाकारण पैसा खर्च होतो. दुसरे असे की राज्य शासनाने आरसी केले जे रेट कॉन्ट्रक्ट आहे त्यांचेकडून खरेदी करावे असा काही नियम नाही. मा.महापौर,मा. आयुक्त यांनी एकत्रित बसून जर कुणी यापेक्षा कमी दराने व चांगल्या प्रतिचे देत असेल तर त्यांना संधी देण्यास हरकत नसावी.

मा.महापौर :जे शिल्लक शैक्षणिक साहित्य आहे त्यांची उदयाच पाहणी करण्यात येईल.विषय मंजूर.

श्री.गजानन बारवाल :शाळा सुरू झाल्या अनेक शाळेच्या इमारतीची दुरूस्ती करणे आवश्यक आहे ती करण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर :प्रशासनाने या बाबतीत त्वरीत कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे सन 2010-2011 या वर्षाकरीता मार्च 2010 विद्यार्थी पट संख्यानुसार मागील शिल्लक साठा विचारात घेवून प्रस्तावात नमुद विद्यार्थी संख्येसाठी प्रस्तावात नमुद महाराष्ट्र शासन उद्योग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय दिनांक 08.12.2009 अन्वये मे.कलावती महिला मंडळ,ठाणे यांच्याकडून तयार शालेय गणवेश खरेदी करणे व इतर साहित्य रेक्झिन व कॅनवॉस शुज,रंगीत व पांढरे सॉक्स आणि नेकटाय निविदा मागवून खरेदी करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र 21 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.समाधान कॉलनी येथील मिळकत नगर भूमापन क्रमांक 18089 ते 18098 व 20183 हे औरंगाबाद शहराच्या सन 1975 साली मंजुर झालेल्या विकास योजने नुसार आरक्षण क्रमांक 89 खुली जागा या आरक्षणाने आरक्षित होत्या. या आरक्षणासाठी रितसर भूसंपादन प्रक्रिया होऊन अंतिम निवाडा जाहीर झाली होता. मात्र न.भु.मा.क्र.20183 चा प्रत्यक्ष ताबा घेण्यास मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठ यांनी स्थिगिती दिली होती.दरम्यानच्या काळात विकास योजना सधारित झाली व एप्रिल 2001 मध्ये मंजुर झालेल्या सुधारीत विकास योजने नूसार सदरील आरक्षण,आरक्षण क्रमांक 316 उदयान असे झाले.

आरक्षण क्रमांक 316 उदयान या आरक्षणापैकी 4000 चौ.मी.क्षेत्रासाठी ड्रम प्रोजेक्ट या महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लि. च्या केंद्रशासन निर्देशित व अनुदानीत असलेल्या अमेरीका व भारत सरकार यांच्या संयुक्त सहभागा अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी आलेल्या मागणी नूसार मा.उच्च न्यायालयाच्या परवानगीने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये कार्यवाही होऊन तेवढया क्षेत्रापुरते फेरबदलास शासनाची मान्यता झाली.

या फेरबदला नूसार ड्रम प्रोजेक्ट साठी अरक्षीत क्षेत्रापैकी नगर भूमापन क्रमांक 18090, 18091 व 18092 एकत्रित क्षेत्र 1397.50 चौ.मी. चा ताबा यापूर्वीच महानगरपालिकेने संबंधीत यंत्रणेस दिला आहे.

नगर भूमापन क्रमांक 20183 चे प्रकरण न्यायप्रविष्ठ होते.या प्रकरणात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने मा.उच्च न्यायालयात अपील दाखल केले. (CA 10670,10672/2009 in W.P.No.3782/94) या प्रकरणी जरी नगर भूमापन क्रमांक 20183 चे महानगरपालिकेच्या नावे निवाडा जाहीर झाला असला तरी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने आवश्यक असणाऱ्या क्षेत्रासाठी नव्याने भूसंपादन अधिकारी,विशेष घटक, यांनी त्यांचे पत्र जा.क्र.2010/विभूसंअ/विशेष घटक/कावि-2/672 दिनांक 12.06.2010 अन्वये पुर्वीचे आरक्षण क्रमांक 89 खुली जागा मधून नगर भूमापन क्रमांक 20183 चे निवाडया नुसार एकूण संपादित क्षेत्र 8607.90 चौ.मी. पैकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ला आवश्यक असणारे क्षेत्र 2602.50 चौ.मी. (ड्रम प्रोजेक्ट साठी शासनाने मंजुर केलेला आरक्षीत क्षेत्राचा भाग) सदर भुसंपादनातुन वगळण्यात यावे असा प्रस्ताव महानगरपालिकेने सादर केल्यास सदर प्रस्तावास मा.विभागीय आयुक्त यांची भूसंपादन अधिनियम 1894 चे कलम 48 नूसार मान्यता घेऊन सदर क्षेत्र दिनांक 29.01.1987 रोजी पारित केलेल्या निवाडयातून वगळून त्यानंतर नगर भूमापन क्रमांक 20183 संपादीत क्षेत्र 8807.90 चौ.मी. मधून आवश्यक असलेले क्षेत्र 2602.50 चौ.मी.वगळून सदर 2602.50 चौ.मी. क्षेत्राच्या संपादनाची कार्यवाही नव्याने करण्यात येईल असे कळविले आहे.

करीता पुर्वीचे आरक्षण क्रमांक 89 खुली जागा पैकी नगर भूमापन क्रमांक 20183 मधून दिनांक 29.01.1987 च्या निवाडयानुसार संपादीत क्षेत्र 8607.50 चौ.मी. पैकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी च्या ड्रम प्रोजेक्ट प्रकल्पा करीता शासनाने मंजुर केलेल्या फेरबदल्या नूसार आवश्यक असणारे क्षेत्र 2602.50 चौ.मी. सदर संपादनातून वगळण्यासाठी मान्यता व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्रमांक 89 खुली जागा पैकी नगर भूमापन क्रमांक 20183 मधून दिनांक 29.01.1987 च्या निवाडयानुसार संपादीत क्षेत्र 8607.50 चौ.मी. पैकी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी च्या ड्रम प्रोजेक्ट प्रकल्पा करीता शासनाने मंजुर केलेल्या फेरबदल्या नूसार आवश्यक असणारे क्षेत्र 2602.50 चौ.मी. सदर संपादनातून वगळण्यास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 22:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाने (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) राज्याच्या नागरी भागातील (महानगरपालिका व नागरी क्षेत्र) आर्थिक दुर्बल घटकातील नागरीकांकरीता वैयक्तीक शौचालय नसलेल्या प्रत्येक घरामध्ये वैयक्तिक शौचालय बांधण्याचा कार्यक्रम शासन निर्णय क्र/कखयो/2008/ प्र.क्र/100/बैशो/पापु21/मंत्रालय मुंबई-32 दिनांक 10 सप्टेंबर 2008 व शासन निर्णय क्र/कखयो/2009/ प्र.क्र/166/पापु21 दिनांक 28 जुलै 2009 अन्वये घेतलेला आहे.

सदर कार्यक्रम शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शहरामध्ये नागरी संस्थांनी नागरी स्वच्छतेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अशासकीय संस्थाच्या (NGO) सहकार्याने राबविणे आवश्यक असून याबाबत योजनेची मार्गदर्शक तत्वे व संकल्पना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

शासन निर्णयानुसार लाभार्थी साठी खालील बाबी या योजनेसाठी अनिवार्य करण्यांत आलेल्या आहे.

- नागरी भागामध्ये आर्थिक दुर्बल घटकातील लाभार्थीचे स्वतःच्या मालकीचे घर असूनही शौचालयाची व्यवस्था नाही (एका कुंटूबामध्ये कमाल 5 व्यक्ती गृहीत धरुन प्रति कुटूंब शौचालय)

- प्रति कुटूंब उत्पन्नाची मर्यादा रु. 3300/- प्रतिमाह इतकी विहीत करण्यात आलेली आहे.
- या योजनेत प्रति कुटूंब शौचालय बांधकाम खर्च रु. 10000/- निश्चित करण्यात आलेला असून यास्तव केंद्र शासन व राज्य शासनाचे अनुदान प्राप्त होणार आहे. या योजनेत लाभार्थीला सुध्दा आर्थिक सहभाग खालील नुसार नोंदवावा लागणार आहे.

| | |
|---|---|
| केंद्र शासन अनुदान हिस्सा (75%) | रक्कम रुपये 7500/- |
| राज्य शासन अनुदान हिस्सा (15%) | रक्कम रुपये 1500/- |
| लाभार्थीचा स्वतःचा हिस्सा (10%) | 10000/-प्रति कुटूंब शौचालय. |

- सदरील योजनेसाठी लाभार्थी निश्चित करणे लाभार्थीना Biometric पध्दतीची ओळखपत्रे देणे,योजनेची जनजागृती करणे,चर्चासत्रे/प्रशिक्षण आयोजीत करणे,लाभार्थी कडील आर्थिक सहभागाची रक्कम गोळा करुन ती नागरी संस्थाकडे जमा करणे इत्यादी कामे शासना मार्फत निवड केलेल्या अशासकीय संस्थेच्या मदतीने करावयाची आहे.
- योजनेसाठी नियुक्त अशासकीय संस्थेचा (NGO) त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला शासनामार्फत दिला जाणार आहे. याबाबतची तरतुद शासनाने त्यांच्या स्तरावर केलेली आहे.
- सदर योजनेत राज्य शासनाकडून प्राप्त अनुदाना पैकी 1% रक्कम महानगरपालिकेस MIS, Monitoring System,Capacity Building,IEC या घटका करीता राखुन ठेवावी लागणार आहे या निधीचा वापर प्रकल्प स्थळांना भेटी देणे,नागरी संस्थाशी समस्वय साधणेसाठी करावयाचा आहे.
- सदरील योजनेसाठी शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ची Nodal Agency म्हणून नियुक्ती केलेली असल्याने प्रस्तावित योजनेचा परीपूर्ण प्रकल्प अहवालाची (DPR) पडताळणी Nodal Agency मार्फत होवून शासनास सादर करावयाचा आहे.

सदर योजने अंतर्गत महानगरपालिके तर्फे वैयक्तिक शौचालयाचे परिपूर्ण अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-09 च्या जिल्हा दरसुचीप्रमाणे रक्कम रुपये 24900/- चे तयार करण्यात आलेले होते त्यामध्ये महानगरपालिकेस रक्कम रुपये 10000/- पेक्षा जास्तीची रक्कम रुपये 14900/- इतके शासन निर्णयानुसार महानगरपालिकेस खर्च करावे लागणार होते.

परंतु महाराष्ट्र शासनाचे कक्ष अधिकारी श्री.प्रितमकुमार जावळे यांनी पत्र क्र/कखयो/2009/ प्र.क्र/258/पापु 21 दिनांक 25.11.2009 नुसार महानगरपालिकेकडून प्राप्त प्रस्ताव हा शासन निर्णय क्र/कखयो 2008/प्र.क्र/100/वै.शौ/पापु 21 दिनांक 10 सप्टेंबर 2008, शासन परीपत्रक /कखयो/2008/प्र.क्र/133/वै.शौ/पापु 21 दिनांक 23 ऑक्टोबर 2008 व शासन परिपत्रक /कखयो/2009/प्र.क्र 86/वै.शौ/पापु 21 दिनांक 6 मे 2009 नुसार अंमलबजावणी कार्यपध्दती नुसार परीपूर्ण नसल्याने परत पाठविलेला आहे.

योजनेतील बांधावयाच्या शौचालय संदर्भाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या संशोधन व प्रशिक्षण केंद्र विभाग,नाशिक यांनी दिलेल्या low cost sanitation model च्या नकाशे व अंदाजपत्रकानुसार द्विशोष खड्डा पध्दतीच्या प्रती शौचालयासाठी (मऊस्तर) रक्कम रुपये 10900/- इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे.

शासन परिपत्रक क्र/कखयो/2009/प्र.क्र224/वै.शौ/पापु21 दिनांक 30 सप्टेंबर 2009 नुसार ज्यानागरी संस्थेच्या हद्दीत वैयक्तीक शौचालय बांधण्यासाठी लाभार्थ्याकडे जागा उपलब्ध नाहीत अशाठिकाणी नागरी संस्थेने आपल्या मालकीच्या जागेवर वैयक्तिक शौचालय बांधणे करण्यास परवानगी दिल्यास अशा ठिकाणी Multiple वैयक्तिक शौचालय बांधल्यास जागेची मालकी नागरी संस्थेकडेच राहील फक्त वैयक्तिक शौचालयाचा वापर संबंधीत लाभार्थी करु शकणार आहे.

त्यानुसार महानगरपालिकेस प्रती शौचालय केंद्र शासन राज्य शासन व लाभार्थीचा हिस्सा एकत्रित करुन रक्कम रुपये 10000/- प्राप्त होणार असल्याने उर्वरीत जास्तीचे रक्कम रुपये 900/- शासन निर्णयानुसार महानगरपालिकेस खर्च करावे लागणार आहे.

तसेच म.जी.प्राधिकरणाने प्रस्तावित केलेले द्विशोषक खड्डा पध्दतीचे शौचालय औरंगाबाद शहराकरीता बहुतांश ठिकाणी शहरात जलनि:सारण वाहीन्या टाकण्यात आलेल्या असल्याने उपयोगात आणता येणार नसल्याने ज्या ठिकाणी जलनि:सारण वाहीन्या आहे त्या ठिकाणी शौचालयाची जोडणी करण्यात येणार आहे तसेच ज्या ठिकाणी जलनि:सारण वाहीन्या नाहीत अश्या ठिकाणी द्विशोषक पध्दतीने अथवा सेप्टीक टॅक पध्दतीने शौचालय बांधता येईल परंतु त्या करीता लाभार्थीकडे जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

प्रस्तावित योजनेच्या कार्यपध्दतीनुसार लाभार्थीचे वार्ड निहाय विवरण व नकाशे तयार करणे स्वयंसेवी संस्थेची नोंदणी करणे,मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठराव पारीत करुन घेणे, शासन निर्देशानुसार/निर्णयानुसार सदर योजना विहीत कालावधीत पूर्ण करुन घेणे जेणेकरुन अनावश्यक कालापव्यय होवून प्रकल्प खर्चात वाढ होणार नाही याबाबत नियोजन करणे प्रस्तावासोबत Undertaking NGO Biometric survey report and Biometric card,Declaration of M.C.Verification Certifacate Utilisation Certificate इत्यादी बाबीची प्रमाणपत्रे प्रस्ताव मंजुर होण्यासाठी सादर करणे प्रकल्पासाठी परीपूर्ण असा प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे वेळोवेळी प्राप्त शासन निर्णय व आदेशानूसार योजनेसाठी कार्यवाही करणे.

करीता केंद्र शासन पुरस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी उपरोक्त नुसार व वेळोवेळी प्राप्त शासन आदेशान्वये/परिपत्रकान्वये आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यासाठी व प्रकल्प अहवाल शासनास पाठविण्यासाठी महापालिका आयुक्तांना अधिकार प्रदान करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अटी शर्तीस अधिन राहून केंद्र शासन पुरुस्कृत कमी खर्चाच्या स्वच्छता योजने अंतर्गत अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी व वेळोवेळी प्राप्त शासन आदेशान्वये/परिपत्रकान्वये आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यासाठी व या योजनेसाठी प्रस्तावात नमूद सर्व कार्यवाही करणे व प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प अहवाल शासनास पाठविण्यासाठी महापालिका आयुक्तांना अधिकार प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.: 23**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र. 26 अंतर्गत बळीराम पाटील चौक ते चिश्तीया चौका पर्यंतचा रस्ता हा नेहमी वर्दळीचा असल्याने या रस्त्यावर सतत व्यापारी वर्गाची व नागरीकांची वर्दळ असते तेथे महिला व पुरुषांसाठी सार्वजनिक शौचालयाची सोय नसल्याने अडचणी निर्माण होत आहे.

करीता मंगेश गॅस शेजारील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर पे अॅड युज तत्वावर आधारीत चालु असलेल्या सुलभ शौचालयाच्या प्रकल्पातुन शौचालय उभारण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक :सौ.प्राजक्ता मंगेश भाले अनुमोदक :श्री.किशोर बाबुराव नागरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. 26 अंतर्गत बळीराम पाटील चौक ते चिश्तीया चौका पर्यंतच्या ठिकाणी पे अॅड युज तत्वावर आधारीत चालु असलेल्या सुलभ शौचालयाच्या प्रकल्पातुन शौचालय उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र :24**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये शासनाच्या नियुक्तीवर सहाय्यक संचालक नगर रचना, या पदावर अधिकारी काम हाताळत होते. त्यांचेकडे त्यांचे मुळ कार्यालयाचा कार्यभार सांभाळून महानगरपालिकेचे वरील पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. महानगरपालिकेचा नगर रचना विभागाचा कामाचा व्याप पाहता संबंधीत अधिकारी यांनी महानगरपालिकेस पूर्ण वेळ कार्यभार सांभाळणे अपेक्षित होते. परंतु संबंधीत अधिकारी महानगरपालिकेस वेळ देऊ न शकल्यामुळे सर्वच पदाधिकारी व नगरसेवकांनी या बाबत नाराजी व्यक्त केली होती. तसेच या मुळे महानगरपालिकेच्या विकास कामावर त्याचा परिणाम जाणवत होतो. या स्थितीमुळे तत्कालीन आयुक्त तथा विभागीय आयुक्त यांनी सहाय्यक संचालक नगर रचना या पदाचा कार्यभार महानगरपालिकेच्या शहर अभियंता यांचेकडे सोपविला. तद्नंतर प्रशासनाने याबाबत आवश्यक नियमानूसार कार्यवाही करुन नगर रचना विभागाच्या एकंदरीत कामाच्या व्यापाचा विचार करुन त्या ठिकाणी योग्य शैक्षणिक पात्रता व अनुभव असलेल्या कार्यकारी अभियंता या संवर्गातील अधिकाऱ्याची पूर्णवेळ नियुक्ती केली. जेणे करुन महानगरपालिकेचे एकंदरीत कामे सुकर होत आहेत. दरम्यान आता शासनाने पुन्हा महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सहाय्यक संचालक नगर रचना या पदावरील महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकाऱ्यांची नियुक्ती रद्द करुन त्या ऐवजी पुन्हा शासन स्तरावरील अधिकारी पुर्णवेळ न देता पुन्हा अतिरिक्त कार्यभारावर नियुक्त करणे बाबतचा निर्णय घेतला आहे. ही बाब पाहता पुर्वीच्या अनुभवानूसार पुन्हा यामुळे महानगरपालिकेच्या विकास कामावर व नगर रचना सारख्या महानगरपालिकेच्या महत्वाच्या महसूल देणाऱ्या विभागावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने शासनाचे वरील निर्णय रद्द करणे बाबत शासनाला कळविणे तसेच महानगरपालिकेने नियमानुसार योग्य शैक्षणिक पात्रता व अनुभव असलेल्या कार्यकारी अभियंता संवर्गातील अधिकाऱ्याचा कार्यभार पुढे कायम करणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | | | |
|---|---|---|---|
| सुचकः | श्री.देसरडा प्रशांत सुभाष, श्री.मधुकर दामोधर सावंत, श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली, श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव, श्री.जैन विकास रतनलाल | अनुमोदकः | श्री.बनकर कृष्णा सांडुजी, श्री.शिंदे राजू रामराव, श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या सहाय्यक संचालक नगर रचना या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या कार्यकारी अभियंता या संवर्गातून सहाय्यक संचालक नगर रचना या पदावर पात्र अधिकाऱ्याची कायम स्वरूपी नियुक्ती केलेली आहे. तद्नंतर महाराष्ट्र शासनाने महानगरपालिकेने केलेली नियुक्ती रद्द करण्यास आदेशित करून या पदावर त्यांचे सहाय्यक संचालक नगर रचना यांना महानगरपालिकेत या पदाचा पुर्ण वेळ कार्यभार न देता अतिरिक्त कार्यभार दिला आहे. महानगरपालिकेतील दैनंदिन कामाचे स्वरूप पाहिले असता येथे पुर्ण वेळ सहाय्यक संचालक नगर रचना यांचे सेवेची नितांत आवश्यकता असल्याने शासनाने अर्धवेळ नियुक्त केलेले सहाय्यक संचालक नगर रचना यांचे आदेश रद्द करण्यासाठी शासनास कळविण्यास व महानगरपालिकेचे पात्र कार्यकारी अभियंता या संवर्गातून नियुक्त केलेले सहाय्यक संचालक नगर रचना यांचा पुर्ण वेळ पदभार पुढेही कायम ठेवण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र : 25</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.14 रोजाबाग मधील मुख्य अंतर्गत साई मेडिकल समोरील चौकास साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक असे नामकरण देवून चौक

विकसीत करणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव होईल व त्यांचा आदर्श समाजापुढे ठेवता येईल.

करीता वार्ड क्र. 14 रोजाबाग मधील मुख्य अंतर्गत साई मेडिकल समोरील चौकास साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक असे नामकरण देवून चौक विकसीत करणे चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक :सौ.संगिता राजु अहिरे अनुमोदक :सौ.प्राजक्ता मंगेश भाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. 14 रोजाबाग मधील मुख्य अंतर्गत साई मेडिकल समोरील चौकास साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक असे नामकरण देवून चौक विकसीत करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद